# कृषि पणन विषयक बातम्या : दि. 01/02/2021 ते 20/05/2021

दै. "सकाळ" दि. १।२।२०२१.

# चौदा वर्षांत २५६ टन हापूस थेट परदेशांत

## प्रक्रिया केंद्रांचा फायदा; 'मँगोनेट'मुळे प्रतिसाद वाढणार

राजेश कळंबटे : सकाळ वृत्तसेवा

रत्नागिरी, ता. ३१ : इंग्लडसह युरोपीय देश, अमेरिका, ऑस्ट्रेलियामध्ये रत्नागिरीच्या हापूसला मोठी मागणी आहे. 'मँगोनेट'मुळे निर्यातदार थेट बागायतदारांकडे जात आहेत. निर्यातीपूर्वी आवश्यक प्रक्रिया रत्नागिरीतच करण्यासाठी नाचणे येथे आंबा प्रक्रिया केंद्र उभारले आहे. २००६ पासून २०२० पर्यंत केंद्रातून २५६ टन आंबा निर्यात करण्यात आला आहे तसेच ८२० टन आंब्यावर प्रक्रिया करून दर्जेदार फळ उपलब्ध करून दिले आहे.

कृषी निर्यात धोरणांतर्गत कृषी पणन मंडळ व 'अपेडा' यांच्या अर्थसाहाय्याने निर्यात सुविधा केंद्र रत्नागिरीत नाचणे येथे २००४ मध्ये उभारले. आंतरराष्ट्रीय देशांच्या निकषानुसार युरोपीय देश, दक्षिण कोरिया, रशिया, मॉरिशस, इराण या देशांना निर्यात करण्यासाठी आवश्यक असलेल्या उष्ण जलप्रक्रिया निर्यात सुविधा केंद्रात उपलब्ध आहेत. जपान, न्यूझीलंड, अमेरिका, ऑस्ट्रेलिया या देशांना निर्यातीसाठी प्रामुख्याने व्हीएचटी आणि विकीरण सुविधा वाशीत उपलब्ध आहे.

**रत्नागिरीतील केंद्रातून चौदा वर्षांतील निर्यात** (आकडे टनांत)



| | | |
|---|---|---|
| २५६<br>२००६ ते २०२० | ३९.०२<br>२००७ | ३२.७०<br>२०१९ |
| ९.५<br>२००६ | ४१<br>२००९ | १.५<br>२०२० कोरोनामुळे फटका |



रत्नागिरी : स्वयंचलित यंत्राद्वारे आंबा वॉशिंग करताना.

> स्थानिक शेतकऱ्यांना फायदा मिळवून देण्यासाठी निर्यातदारांचा शोध घ्यावा लागत नाही. युरोपसह दुबई आणि कॅनडाला आंबा पाठविला आहे. आमच्या शाखा असल्यामुळे निर्यातदारांची साखळी तयार आहे. त्याचा रत्नागिरीतील बागायतदारांना फायदा होईल.
>
> - विश्वपाल मोरे, प्रक्रिया केंद्रचालक

दै. "अॅग्रोवन" दि. १/२/२०२१.

# केसर आंबा निर्यातीसाठी 'पणन'ने कसली कंबर

संतोष मुंढे : अॅग्रोवन वृत्तसेवा



**औरंगाबाद :** जगातील इतर देशांना आंबा निर्यातीची खासकरून केसर आंबा निर्यातीची असलेली संधी उत्पादकांना अवगत करून देण्याच्या अनुषंगाने कृषी पणन मंडळाने कंबर कसली आहे. 'केसर मँगो' झोनची शुक्रवारी (ता.२२) ऑनलाइन बैठक घेतली गेली. केसर आंबा निर्यातीवृद्धीसाठी 'मँगोनेट'वर नोंदणीच्या आवश्यकतेसह उपलब्ध सुविधांचा ऊहापोहही या बैठकीतून करण्यात आला.

कृषी पणन मंडळाचे सरव्यवस्थापक दीपक शिंदे व कार्यकारी संचालक सुनील पवार यांच्या मार्गदर्शनाखाली या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीमध्ये औरंगाबाद व जालना जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाच्या प्रतिनिधींसह औरंगाबाद येथील फळ संशोधन केंद्राचे प्रमुख डॉ. एम. बी. पाटील, केसर आंबा तज्ज्ञ तथा महाकेसर आंबा बागायतदार महासंघाचे सचिव डॉ. भगवानराव कापसे, निर्यातदार कृष्णा भगत, निर्यात विभागाचे सतीश वराडे, देशांतर्गत विभागाचे मंगेश कदम आदी मार्गदर्शक म्हणून सहभागी झाले होते. प्रास्ताविक पणन मंडळाचे विभागीय उपसरव्यवस्थापक जे. सी. वाघ यांनी केले.

केंद्र सरकारने डिसेंबर २०१८ मध्ये कृषी निर्यात धोरण जाहीर केल्यानंतर राज्यानेही या धोरणाची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने पावले उचलली. त्यानुसार राज्याच्या कृषी निर्यात धोरणामध्ये पीकनिहाय २१ क्लस्टर्स प्रस्तावित करण्यात आले. त्यामध्ये मँगो क्लस्टर्समध्ये औरंगाबाद, जालना, बीड, लातूर, नगर, नाशिक आदी जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला.

## 'मँगोनेट'वर २९ हजार बागायतदारांची नोंदणी

जगाची आंब्याची मागणी जवळपास साडेचौदा लाख टन आहे. आपल्या देश दरवर्षी फक्त ५० हजार टन आंबा निर्यात करतो. त्यामुळे मोठी संधी केसर आंबा निर्यातीमध्ये आहे. त्यासाठी प्राधान्याने प्रत्येक केशर आंबा उत्पादकाने मँगोनेटवर नोंदणी करणे आवश्यक आहे. राज्यात आतापर्यंत २९ हजार आंबा उत्पादकांनी नोंदणी केली आहे. सद्यःस्थितीत होत असलेली निर्यात सौदी अरब व दुबईमध्ये प्रामुख्याने होते. परंतु शाश्वत व चांगले दर मिळणारी बाजारपेठ म्हणून आंबा निर्यात करू इच्छिणाऱ्यांनी युरोपियन देशांसह अमेरिकेकडे लक्ष केंद्रित करायला हवे.

दै. "ॲग्रोवन" दि. ४/२/२०२१.

# दुष्काळी आटपाडीतून ६५० टन फळांची निर्यात

## डाळिंब, केळी, द्राक्षांचा समावेश, सुविधा केंद्राचा लाभ

**ॲग्रोवन वृत्तसेवा**

**आटपाडी, जि. सांगली :** चवदार, लालभडक आणि निर्यातक्षम तजेलदार डाळिंबनिर्मिती करणाऱ्या आटपाडी तालुक्यातील कृषी पणन मंडळाच्या निर्यात सुविधा केंद्रावरून लॉकडाउन आणि हवामानाच्या अत्यंत प्रतिकूल परिस्थितीही विक्रमी ६५० टन डाळिंब, द्राक्ष आणि केळीची निर्यात झाली आहे.

आटपाडी तालुका दर्जेदार आणि निर्यातक्षम डाळिंब निर्मितीसाठी ओळखला जातो. तालुक्यातून युरोपियन राष्ट्रांना रेसीड्यू फ्री डाळिंबाची मोठ्या प्रमाणावर निर्यात होते. तसेच जवळच असलेल्या तासगाव आणि खानापूर तालुक्यांमध्ये द्राक्षाचे मोठे उत्पादन घेतले जाते. डाळिंब आणि द्राक्ष निर्यातीसाठी निर्यात सुविधा केंद्राची शेतकऱ्यांची मागणी होती. याची दखल घेऊन कृषी पणन महामंडळाने आटपाडीत पाच कोटी रुपये गुंतवणूक करून निर्यात सुविधा केंद्र उभारले. यामध्ये ५० टनांचे शीतगृह, ५ टनाचे प्रीकूलिंग आणि दोन हजार स्क्वेअर फुटांचे पॅकहाउस या सुविधा उभा केल्या.

> **पणन मंडळ आणि बाजार समितीच्या माध्यमातून सुरू असलेल्या निर्यात सुविधा केंद्रावरून ६५० टन फळांची निर्यात झाली आहे. ज्या उद्देशाने सुविधा केंद्र उभारले होते तो यशस्वी झाला आहे.**
>
> **- भाऊसाहेब गायकवाड,**
> सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती, आटपाडी



सध्या सुविधा केंद्र कृषी पणन मंडळ आणि बाजार समितीच्या माध्यमातून सद्‌गुरू एंटरप्राइजेस मुंबई, भाडेतत्त्वावर चालवत आहेत. लॉकडाउन आणि प्रतिकूल हवामानाच्या परिस्थितीला तोंड देत आटपाडी सुविधा केंद्रावरून ३३६ टन डाळिंबाची निर्यात केली, तर ५० टन डाळिंब देशांतर्गत बाजारपेठेत पाठवले. तसेच १९५ टन द्राक्ष, ०.५० टन केळी आणि पपईची निर्यात केली आहे. सुविधा केंद्रावरून विक्रमी ६५० टन फळांची निर्यात केली आहे. निर्यात सुविधा केंद्र निर्माण झाल्यामुळे व्यापाऱ्यांसमोरील अडचणी दूर झाल्या आहेत. त्यामुळे व्यापारीही चांगल्या भावाने माल खरेदी करत आहेत.

दै. "ॲग्रोवन" दि. ६।२।२०२१.

# 'ई-नाम'द्वारे सव्वा लाख कोटींची उलाढाल

## केंद्रीय कृषी मंत्रालयाची माहिती, एक हजार बाजार समित्यांचा समावेश

**ॲग्रोवन वृत्तसेवा**

**पुणे** : 'एक देश एक बाजार' या संकल्पनेवर आधारित राष्ट्रीय ऑनलाइन कृषी बाजारात (ई-नाम) मध्ये १८ राज्ये आणि तीन केंद्रशासित प्रदेशांमधील नव्याने १ हजार बाजार समित्यांचा समावेश करण्यात आला आहे. यापूर्वी सहभाग घेतलेल्या १ हजार बाजार समित्यांमधील ई-नामद्वारे १ कोटी ६९ लाख शेतकरी, १ कोटी ५५ लाख खरेदीदार आणि व्यापाऱ्यांच्या नोंदीद्वारे १ लाख २२ कोटींची उलाढाल झाल्याची माहिती केंद्रीय कृषी मंत्रालयाने दिली आहे.

बाजार समित्यांमधील शेतीमाल खरेदी- विक्रीच्या पारंपरिक व्यवस्थेतील शेतकऱ्यांची लूट रोखण्यासाठी केंद्र सरकारने राष्ट्रीय ऑनलाइन कृषी बाजाराची योजना आणली. यासाठी प्रत्येक बाजार समितीला ३ लाखांचा निधी देण्यात आला आहे. गेल्या दोन वर्षांत योजनेच्या यशस्विततेच्या दाव्यानंतर केंद्र सरकारने यंदाच्या अर्थसंकल्पात पुन्हा १ हजार बाजार समित्यांचा समावेश ई-नाम योजनेमध्ये केला आहे. ई-नामद्वारे शेतकऱ्यांसाठी 'एक देश एक बाजार' संकल्पनेवर संपूर्ण देशात कुठेही शेतीमालाची विक्री करू शकणार आहे.

### ॲप विकसित

ई-नामच्या संगणकप्रणाली बरोबरच आता ॲपदेखील विकसित करण्यात आले असून, ॲपद्वारे शेतकरी शेतीमालाची विक्री करू शकणार आहे. वैयक्तिक शेतकऱ्यांशिवाय शेतकरी उत्पादक कंपन्या, गोदामे या योजनेत सहभाग घेऊ शकणार आहे. याद्वारे देशभरातील १ हजार ८४४ उत्पादक कंपन्या ई-नामशी जोडल्या गेल्या असून, ई-नामद्वारे डिजिटल बाजाराचे वातावरण तयार झाले आहे. याद्वारे शेतीमालाला विमादेखील मिळणार आहे.

दै. "पुढारी" दि. २३।२।२०२१.

# विपरित हवामानाचा आंब्याला फटका

## हंगाम उशिरा सुरू होण्याची शक्यता

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सध्या हवामानात होणा-या विचित्र बदलामुळे आंब्याच्या उत्पादनावर विपरित परिणाम होणार असून, उशीरा आलेल्या थंडीमुळे आंब्याचे उत्पन्न घटण्याची शक्यता आहे. आंब्याला मोहोर येण्याऐवजी पालवीच फुटली आहे. त्यामुळे यावर्षी आंब्याचा हंगाम एक महिन्याने उशिरा सुरू होईल, असा प्राथमिक अंदाज आहे.

मार्चमध्ये आंब्याची आवक कमी राहण्याची शक्यता आहे. विकसित देशांना पुणे विभागातून मोठ्या प्रमाणावर आंबा निर्यात केला जातो. त्यासाठी आवश्यक असलेली 'मँगोनेट' नोंदणी कृषी विभागामार्फत करण्यात येते. या नोंदणीसाठी कृषी विभागाने प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केला आहे. १२ हजार ५०० आंबा उत्पादक शेतकऱ्यांची यात नोंदणी झाली आहे. त्यात हापूसची नोंदणी करणारे सुमारे नऊ हजार आहेत.

**'पणन'कडे अद्ययावत सुविधा**

पणन मंडळाकडे निर्यातीसाठी सुविधा अद्ययावत पध्दतीची आहे. जपान, न्यूझीलंड, दक्षिण कोरियात पाठवण्यात येणाऱ्या २०० मेट्रीक टन आंब्यावर तर युरोप, मॉरिशस येथे पाठवण्यात येणाऱ्या ३०० मेट्रीक टन आंब्यावर प्रक्रीया करण्याची सुविधा आहे.

**'हापूस'ला मिळाला संकेतांक**

हापूस आंब्याला 'हापूस' याच नावाने विक्री करता यावी व इतर भागातील आंब्याची त्यात भेसळ होऊ नये म्हणून भौगोलिक संकेतांक (जीआय) देण्यात येणार आहे. यामध्ये आतापर्यंत ३६८ आंबा उत्पादकांनी नोंदणी केली आहे. त्यामुळे न्यूझीलंड या देशात आंबा निर्यात लवकरच सुरू होईल. वाशी येथील विकिरण सुविधा केंद्रातून ऑस्ट्रेलिया, अमेरिका देशात एप्रिलच्या पहिल्या आठवड्यापासून निर्यातीचे नियोजन आहे.

दै. "ॲग्रोवन" दि. १४।२।२०२१. 3

# क्लस्टरच्या माध्यमातून शेतीमाल निर्यातीला गती

## सुनील पवार : हवामान विभागनिहाय २१ क्लस्टर स्थापन

**ॲग्रोवन वृत्तसेवा**

**पुणे** : केंद्र सरकारच्या कृषी निर्यात धोरणांतर्गत पणन मंडळाने विविध पिकांचे कृषी हवामान विभागनिहाय २१ क्लस्टर स्थापन केले आहेत. या माध्यमातून शेतीमाल निर्यातीला गती मिळणार आहे. यामुळे निर्यातीत महाराष्ट्र देशात अग्रेसर राहील, असा विश्वास राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार यांनी व्यक्त केला.

पान ४ वर »

### अडचणी सोडविण्यासाठी स्वतंत्र कक्षाची स्थापना

राज्यातून जास्तीत जास्त शेतीमाल निर्यात व्हावा, यासाठी तरुण शेतकऱ्यांना पणन मंडळाच्या वतीने प्रशिक्षण दिले जात आहे. याद्वारे शेतकरी स्वतः निर्यात झाले आहेत. याचा फायदा शेतकऱ्यांच्या शेतमालाला परकीय बाजारपेठ उपलब्ध होऊन, उत्पन्नवाढीसाठी झाला आहे. शेतकऱ्यांना थेट निर्यातीसाठी होणाऱ्या अडचणींची सोडवणूक करण्यासाठी पणन मंडळाने स्वतंत्र कक्षदेखील स्थापन केला आहे. याद्वारे शेतकऱ्यांच्या समस्या सोडविल्या जात आहेत, असेही पवार यांनी सांगितले.

# क्लस्टरच्या माध्यमातून शेतीमाल निर्यातीला गती

» पान १ वरून

कृषी निर्यात धोरणांतर्गत राज्यातील विविध घटकांना निर्यातीद्वारे प्रोत्साहन देण्याबरोबरच अडचणी जाणून घेण्यासाठी पणन मंडळाच्या वतीने शुक्रवारी (ता.१२) दूरदृश्यप्रणालीद्वारे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीला राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार, व्यवस्थापकीय संचालक दीपक शिंदे, सोलापूरचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजेंद्र माने, राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ. मल्लिकार्जुन, कांदा लसूण संशोधन केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ. आर. बी. काळे, पुष्पसंशोधन संचालनालयाचे शास्त्रज्ञ डॉ. गणेश कदम, राज्य फलोत्पादन व औषधी मंडळाचे सल्लागार गोविंद हांडे, पणन मंडळाच्या निर्यात विभागाचे प्रमुख सतीश वराडे, मंगेश कदम, फळे भाजीपाला निर्यात संघटनेचे माजी उपाध्यक्ष इक्रम हुसैन, निर्यातक्षम फूल उत्पादक रूपक बेरी आदी मान्यवर उपस्थित होते.

या वेळी पवार म्हणाले, "राज्य कृषी पणन मंडळाच्या वतीने विविध ठिकाणी सुमारे ४५ निर्यात सुविधा केंद्रे उभारली आहेत. या केंद्राद्वारे विविध देशांच्या मागणीनुसार निर्यात सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. याचा लाभ स्थानिक शेतकऱ्यांसह निर्यातदारांना होत आहे."

दरम्यान, विविध मान्यवरांनी निर्यात क्षेत्रातील बदलांविषयी मार्गदर्शन केले. पुणे विभागीय उप सरव्यवस्थापक प्रशांत सूर्यवंशी यांनी प्रास्ताविक केले. तर आदित्य माने यांनी आभार मानले.

दै. "सकाळ" दि. 17/2/2021

सकाळ

पुणे शहर

# फळांच्या राजाचा हंगाम यंदा उशिरा

## अवेळी-जास्त पाऊस, थंडीचा आंबा उत्पादनावर परिणाम

प्रवीण डोके

मार्केटयार्ड, ता. १६ : अवेळी आणि जास्त कालावधीसाठी झालेला पाऊस, उशिराने सुरु झालेली थंडी यामुळे आंबा हंगामावर विपरीत परिणाम होण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे आंबा हंगाम जवळपास एक महिना उशिरा सुरु होईल, असा अंदाज आहे.

मार्चमध्ये आंब्याची आवक अतिशय अल्प राहील, असा व्यापाऱ्यांचा अंदाज आहे. एकंदरीतच आंबा उपलब्धतेचा कालावधी यंदा कमी असणार आहे. त्यामुळे राज्याच्या पणन मंडळाकडून आंब्याच्या निर्यातवाढीसाठी प्रयत्न केले जात असल्याची माहिती मंडळाचे व्यवस्थापक सतीश वराडे यांनी दिली.

### अशी आहेत कारणे

- अवेळी, जास्त काळ पाऊस
- मोहोराऐवजी पालवी
- मोहोर प्रक्रिया उशिराने सुरु
- उशिराने सुरु झालेली थंडी

आंबा निर्यातीसाठी क्रमप्राप्त असलेली मँगोनेट नोंदणीसाठी प्रशिक्षण कार्यक्रम, शेतीशाळा अशा उपक्रमातून शेतकऱ्यांना प्रोत्साहित करण्यात येत आहे. यंदा साडेबारा हजार आंबा उत्पादक शेतकऱ्यांची मँगोनेट अंतर्गत नोंदणी झाली आहे. यामध्ये हापूस आंब्याचे नोंदणी झालेले शेतकरी सुमारे ९ हजार असून अजूनही शेतकऱ्यांची नोंदणी सुरु असल्याचे वराडे यांनी सांगितले. आंब्याला भौगोलिक संकेतांक नोंदणी अर्थात जीआय प्राप्त झाली असून कोकणातील आंबा हापूस या नावाने विक्री करता यावा व इतर भागातील उत्पादित आंब्याची भेसळ होवू नये, यासाठी भौगोलिकं संकेतांक नोंदणीसाठी आंबा उत्पादक, विक्रेते, निर्यातदार व खरेदीदार यांना प्रोत्साहित करण्याच्या दृष्टीने कृषी पणन मंडळामार्फत प्रयत्न करण्यात येत आहे.



मार्केटयार्ड : आंबा प्रतवारीचे सुरु असलेले काम.

> बागायतदारांची मँगोनेटमध्ये नोंदणी, निर्यातवृध्दीसाठी योजना, देशांतर्गत विक्री व्यवस्थेच्या नियोजनामुळे यंदा आंबा उत्पादनावर परिणाम झाला असला तरी उत्पादकांना चांगला दर प्राप्त होऊन ग्राहकांना उत्तम प्रतीचा आंबा उपलब्ध होण्यासाठी मदत होईल. कृषी पणन मंडळाने आंबा हंगाम २०२१ चे नियोजन सुरु केले आहे. मंडळामार्फत आंबा विक्रीसाठी महोत्सव व निर्यातीबाबत कार्यशाळा, आंबा उत्पादक शेतकऱ्यांनी निर्यातदार व्हावे, यासाठी निर्यात प्रशिक्षण कार्यक्रम व अपेडाच्या सहकार्यातून आंब्यासाठी खरेदीदार विक्रेता संमेलनाचे नियोजन करण्यात येत आहे.
> 
> - सुनील पवार, कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक

### आंतरराष्ट्रीय सुविधा केंद्राची उभारणी

आंतरराष्ट्रीय पातळीवर आवश्यक निकषांची पुर्तता करून व्हेपर हीट ट्रीटमेंट सुविधा, विकीरण सुविधा तसेच भाजीपाला प्रक्रिया केंद्र या तीनही अद्ययावत सुविधांची उभारणी वाशी नवी मुंबई येथे केली आहे. पणन मंडळाच्या भाजीपाला प्रक्रिया केंद्र वाशी येथून आंब्यावर उष्णजल प्रक्रिया करून युरोपियन देशांना निर्यात करण्यात येते. अमेरिका व ऑस्ट्रेलियाकरीता आवश्यक असलेली तीन मिनिटांची ५० ते २०० पीपीएम सोडियम हायपोक्लोराईडची ५२ डिग्रीच्या प्रक्रियेकरीता सुविधा तयार केली आहे. दक्षिण कोरिया, जपान, न्यूझीलंड, अर्जेंटिना, मलेशिया येथे निर्यातीसाठी प्रयत्न सुरु आहेत.

दै. "ॲग्रोवन" दि. ३/०२/२०२१.

# तोट्यातील बाजार समित्यांचा अभियानांतर्गत विकास होणार

## पणन संचालनालयाकडून मार्गदर्शक सूचना जारी

**ॲग्रोवन वृत्तसेवा**



पुणे : स्वनिधीअभावी ज्या बाजार समित्यांना विकासकामे करणे शक्य नाही, अशा बाजार समित्यांच्या विकासासाठी स्वारस्य अभिव्योक्ती अभियानांतर्गत निधीची उपलब्धता करून देण्याची तयारी पणन संचालनालयाने केली आहे. यासाठीच्या मार्गदर्शन सूचना संचालनालयाद्वारे जारी करण्यात आल्या आहेत. याद्वारे बाजार समित्या व्यापारी गाळे बांधून त्याद्वारे उत्पन्न वाढ करू शकणार आहेत.

याबाबतची माहिती पणन संचालक सतीश सोनी यांनी दिली. ते म्हणाले, "फायद्यातील किंवा ज्या बाजार समित्यांकडे स्वनिधी आहे. त्या बाजार समित्या पणन संचालनालय, पणन मंडळाकडून १२(१) च्या परवानग्या घेऊन, विकासकामे करतात. यामध्ये अनेक बाजार समित्यांनी लिलावगृहे, अंतर्गत रस्ते, प्रशासकीय इमारती, व्यापारी गाळे, शीतगृहे आदी उभारून, शेतकऱ्यांना सेवेबरोबरच व्यवसायवृद्धी केली आहे. मात्र अनेक बाजार समित्या तोट्यात असून, वाढत्या शहरीकरणामुळे त्यांच्याकडे असणाऱ्या जागा आता शहरांमध्ये आल्या आहेत. परिणामी, जागांचे बाजारमूल्य वाढले आहे. मात्र बाजार समित्यांकडे स्वनिधी नाही, वित्तीय संस्था कर्ज देऊ शकत नाही. अशा बाजार समित्यांसाठी जागेचा व्यावसायिक वापराबरोबर उत्पन्नवाढीसाठी स्वारस्य अभिव्योक्ती अभियान राबविण्यात येत आहे."

या अभियानांतर्गत बाजार समित्यांनी प्रकल्प व्यवहार्यता अहवाल पणन संचालनालयाला सादर करावयाचा आहे. या अहवालाला पणन संचालनालय, जिल्हा उपनिबंधक कार्यालयाकडून मंजुरी मिळाल्यानंतर प्रकल्प उभारण्यात येणार आहे.

**आर्द्रता मापक, चाळणी यंत्रे बसवा**

ज्या बाजार समित्यांमध्ये अन्नधान्ये, कडधान्ये, तेलबियांची मोठ्या प्रमाणावर आवक होऊन, खासगी आणि शासकीय खरेदी होते, अशा ठिकाणी शेतीमालाचा दर्जा राखण्यासाठी आर्द्रता मापक यंत्र आणि चाळणी यंत्रे बसविण्याचे आदेश पणन संचालक श्री. सोनी यांनी दिले आहेत. शासकीय अनुदान घेऊन आणि वारंवार सूचना देऊन सुद्धा अनेक बाजार समित्यांनी यंत्रे बसवलेली नाहीत. तर काही बाजार समित्यांनी बसविण्यास थेट नकार दिल्याचे प्रकार समोर आल्याचे पणन संचालनालयाच्या निदर्शनास आले आहे. ही बाब गंभीर असून, बाजार समित्यांच्या उद्देशाला छेद देणारी आहे. यामुळे तातडीने बाजार समित्यांनी यंत्रे बसविण्यात यावीत, असे आदेश देण्यात आले आहेत.


दै. लोकमत दि. २८/२/२०२४ (सोलापूर आवृत्ती) 6

# बाजार समित्यांनी धान्य चाळण बसविणे बंधनकारक

## पणन संचालकांचे पत्र;

लोकमत न्यूज नेटवर्क

सोलापूर : राज्यातील बाजार



समित्यांना धान्य चाळण यंत्र व मॉइश्चर (आर्द्रता) मीटर कार्यान्वित करण्यात यावेत, असे पत्र पणन संचालक सतीश सोनी यांनी दिले आहे.

राज्यात ३०६ बाजार समित्या आहेत. या समित्यांमध्ये अन्नधान्ये, कडधान्ये व तेलबियांची विक्री होते. शेतमालाची चाळण यंत्राद्वारे साफसफाई करून काडीकचरा वेगळा करणे आवश्यक आहे. यामुळे शेतमालाचा दर्जा गाठण्यास मदत होते. शिवाय स्वच्छ धान्यातून शेतकऱ्यांना किमान आधारभूत योजनेनुसार लाभ घेता येतो. धान्य चाळण बसविण्यासाठी शासनाने बाजार समित्यांकडे पाठपुरावा केला आहे. ज्या बाजार समित्यांनी धान्य चाळण यंत्रे बसवली आहेत, तेथे वापर केला जात नसल्याचे पणन संचालकांच्या पत्रात म्हटले आहे. त्यामुळे धान्य चाळणी वापरात आणाव्यात, असे पणन संचालकांच्या पत्रात म्हटले आहे.

### सहकार मंत्र्यांचेही आदेश

- सध्या २० बाजार समित्यांमध्ये धान्य चाळण यंत्रे बसविली आहेत; तर केंद्र सरकारने ई-नाम व राष्ट्रीय कृषी विकास योजनेत अनुदान तत्त्वावर नव्याने ८५ बाजार समित्यांना चाळण यंत्र मंजूर केली आहेत.
- अनुदान दिले तरीही काही बाजार समित्यांनी धान्य चाळण बसविण्यासाठी अनास्था दाखविली असल्याचे पणन संचालकांनी पत्रात म्हटले आहे.
- सहकार व पणन मंत्री बाळासाहेब पाटील यांनी ९ फेब्रुवारी रोजी घेतलेल्या बैठकीत धान्य चाळण व मॉइश्चर तपासणी मीटर बसविणे सक्तीचे करण्याच्या सूचना दिल्या.

१५५

Solapur Main

दै. "पुढारी" दि. २१/२/२०२१.





# फळांच्या राजाची विदेशवारी यंदाही काटेरी मार्गावरून!

## गतवर्षी कोकणातून दीड टन आंबा निर्यात; यंदा निर्यातीच्या निकषांबाबत अनभिज्ञता

**रत्नागिरी : पुढारी वृत्तसेवा**

कोरोना महामारीने आलेल्या प्रतिबंधामुळे गतवर्षी कोकणातून केवळ दहा टक्केच आंबा निर्यात झाला होता. ऐन मार्च महिन्याच्या आंबा हंगामात लागलेले ग्रहण यावर्षीही कायम राहण्याची शक्यता असताना प्रतिकूल वातावरणाने यंदाचा निर्यातीचा हंगामही मागील पानावरून पुढे सुरू राहणार असल्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे यावर्षी कोकणच्या राजाची परदेशवारी काटेरी ठरण्याची शक्यता आहे.

कोकणातील हापूसची चव सातासमुद्रापार पोहोचली असताना 'मँगोनेट'द्वारे या निर्यातीला पाठबळ देण्याचा प्रयत्न अपेडा आणि कृषी पणन मंडळाच्या सहकार्याने २००६ पासून सुरू झाला. याकरिता निर्यात नोंदणी करण्यासाठी मँगोनेटचा पर्याय उपलब्ध करून देण्यात आला होता. मात्र, अनेकदा उष्ण जल चाचणी, साका यासारख्या तांत्रिक बाबीत निर्यात अडचणीत येत होती. पणन आणि अपेडाने यावर तोडगा काढण्यासाठी रत्नागिरी जिल्ह्यातच आंबा निर्यात केंद्रात या सुविधा उपलब्ध केल्या. आता ही सुविधा पणनच्या मार्गदर्शनाखाली एका खासगी संस्थेकडे देण्यात आली आहे.

पहिल्याच वर्षात या केंद्राच्या माध्यमातून दहा टन आंबा आखाती देशांसह युरोप वारीवर



रवाना झाला होता. २००७ मध्ये ४०.२२ टन, २००९ मध्ये ४१.१२ टन निर्यात झाली. यानुसार ही शृंखला सातत्याने कमी-अधिक राहिली. २०१९ च्या हंगामात ३४.३७ टन आंबा येथून निर्यात झाला. मात्र, गतवर्षी कोरोना प्रतिबंधामुळे या केंद्राच्या माध्यमातून केवळ दीडच टन आंबा निर्यात झाली. गेल्यावर्षी मार्चमध्ये सुरू झालेले हे दुष्टचक्र यावर्षी कायम राहण्याची शक्यता निर्यातदार संस्थेकडून वर्तविण्यात येत आहे. निर्यातीबाबत अद्याप साशंकता असताना मँगोनेटद्वारे निर्यात करणाऱ्यांची संख्या मात्र दुपटीने वाढली आहे. यासाठी रत्नागिरी जिल्ह्यात या एकाच वर्षात साडेचार हजार बागायतदारांची 'मँगोनेट'साठी नोंदणी झाली आहे.

तर या प्रक्रियेत आता ८ हजार नोंदणीकृत बागायतदार झाले आहेत. निर्यातदारांसाठी आंबा निर्यात करणाऱ्या संस्थाही थेट दारात उभ्या असल्या, तरी जगभर असलेल्या कोरोनाचे मळभ यात अडचणीचे ठरत आहे. अशातच यंदा प्रतिकूल वातावरणाचा फटकाही आंबा बागायतीला बसला असल्याने यावर्षी कोकणच्या राजाचा परदेश प्रवास अडथळ्यांचा आणि अडचणीचा राहणार आहे.

**कोकणातील मँगोनेट नोंदणी**

| जिल्हा | नोंदणी |
|---|---|
| ठाणे | ३,२४४ |
| पालघर | २,३१४ |
| रायगड | २,०१९ |
| रत्नागिरी | ७,९६५ |
| सिंधुदुर्ग | ६,३६७ |
| एकूण | २१,९०९ |

सोमवार, २२ फेब्रुवारी २०२१
सकाळ अॅग्रोवन


# बाजार समित्यांसाठी सौरऊर्जा धोरण लवकरच

## सौर आणि हरित ऊर्जेद्वारे समित्यांना स्वयंपूर्ण करणार

गणेश कोरे : अॅग्रोवन वृत्तसेवा

**पुणे** : नवीन पणन कायदा अद्याप लागू झाला नसला तरी भविष्यात बाजार समित्यांचे अस्तित्व कायम ठेवत त्यांच्या खर्चामध्ये बचतीबरोबरच उत्पन्नाचे नवीन स्रोत निर्माण करण्यासाठी पणन संचालनालयाने पुढाकार घेतला आहे. यामध्ये प्रामुख्याने राज्यातील सर्व बाजार समित्या सौरऊर्जेसह कचऱ्यावर प्रक्रिया करुन होणाऱ्या ऊर्जेवर स्वयंपूर्ण होऊन वीज विक्रीद्वारे उत्पन्न वाढीसाठी सौर आणि हरित ऊर्जेचे धोरण आखणी करत आहे. यासाठी ऊर्जा आणि महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) यांचे मार्गदर्शन घेतले जाणार आहे.

खुल्या अर्थव्यवस्थेकडे देशाची आणि जगाची वाटचाल सुरु असताना, शेतमाल खरेदी विक्रीची व्यवस्था असणारे पारंपारिक पणन कायदे देखील वेगाने बदलत आहे. या कायदे बदलांमुळे शेतमाल खरेदी विक्रीवरील नियमन टप्प्याटप्प्याने रद्द होणार आहे. परिणामी बाजार समित्यांच्या उत्पन्नावर विपरीत परिणाम होणार आहे. यामुळे बाजार समित्यांचे अस्तित्व कायम राहण्यासाठी त्यांना उत्पन्नाचे नवीन स्रोत निर्माण करण्यासाठी पणन संचालनालयाद्वारे धोरण निश्चिती केली जात आहे. यामध्ये शेतमाल खरेदी विक्री बरोबरच गोदामे, शीतगृहे, प्रक्रिया उद्योगांना प्रोत्साहन दिले जाणार आहे. तसेच ग्रामिण भागातील आरोग्य सेवा बळकट करण्यासाठी बांधा वापरा आणि हस्तांतरित करा या तत्त्वावर रुग्णालये, शेतकरी बाजार देखील उभारले जाणार आहेत. या नव्याने बांधण्यात येणाऱ्या व्यवस्था सौर ऊर्जेबरोबरच ग्रीन ऊर्जेवर स्वयंपूर्ण होण्यासाठी देखील धोरण आखले जात आहे. बाजार समित्यांच्या सद्यःस्थितीतील इमारती, नव्याने बांधण्यात येणाऱ्या इमारती आणि रिकाम्या वापरात नसलेल्या जागांवर सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यात येणार आहे.



**राज्यात ३०७ बाजार समित्या आणि ९०० उपबाजार असून, हजारो एकर जमीन उपलब्ध आहे. या पायाभूत सुविधांचा योग्य वापर विक्री न करता उत्पन्न वाढीसाठी कसा करता येईल. याचा अभ्यास सध्या सुरु आहे. देशात कोणकोणत्या बाजार समित्यांनी प्रकारे उल्लेखनीय योजना राबविल्या आहेत का? याची देखील माहिती संकलित केली जात आहे. नव्या धोरणांमुळे बाजार समित्यांचा कोट्यवधी रुपयांचा खर्च कमी होऊन, उत्पन्नवाढीबरोबरच शेतकऱ्यांना अधिक चांगल्या सुविधा मिळतील.**
– **सतीष सोनी**, पणन संचालक

यामध्ये गुंतवणूकदार, बाजार समिती हिस्सा, पतपुरवठा आदि विविध बाबींवर पणन संचालनालयाकडून अभ्यास सुरु आहे. या अभ्यासाअंती सौर आणि हरित ऊर्जेचे धोरण सर्व बाजार समित्यांना लागू केले जाणार आहे.

दै. "अॅग्रोवन" दि. २४।२।२०२१.

# 'ई-नाम'द्वारे १०० कोटी पेमेंटचा दावा

गणेश कोरेः अॅग्रोवन वृत्तसेवा

**पुणे** : गेल्या चार वर्षांत 'ई-नाम' अंतर्गत ४ हजार ५५६ कोटींच्या १५० लाख क्विंटल शेतीमालाची उलाढाल होऊन १०० कोटींचे ऑनलाइन पेमेंट झाल्याचा दावा राज्य कृषी पणन मंडळाने केला आहे. 'ई-नाम'द्वारे पेमेंट करणारे महाराष्ट्र हे देशातील तिसरे राज्य ठरले आहे. मात्र राज्याच्या बहुतांश बाजार समित्यांमध्ये ऑनलाइन लिलाव होतच नसल्याचे चित्र असून, अनेक बाजार समित्यांमध्ये झालेले व्यवहार नंतर ऑनलाइन दाखविले जात असल्याचे वास्तव आहे.

पारंपारिक पद्धतीतून शेतकऱ्यांची फसवणूक रोखण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या शेतीमालास रास्त भाव मिळवून देण्यासाठी केंद्र शासनाने राष्ट्रीय कृषी बाजार (इलेक्ट्रॉनिक नॅशनल अॅग्रिकल्चर मार्केट, ई-नाम) ही योजना एप्रिल २०१६ पासून सुरु केली आहे. राज्यातील ११८ बाजार समित्यांचा तीन टप्प्यांमध्ये समावेश करण्यात आला.

या योजनेद्वारे शेतमालाची बाजार समितीच्या प्रवेशद्वारावरच नोंद, लॉट मॅनेजमेंट, शेतमालाची गुणवत्ता तपासणे, ई-ऑक्शन करणे, शेतमालाचे वजन, सेल अॅग्रिमेंट, सेल बिल व शेतकऱ्यांना ऑनलाइन पेमेंट याप्रमाणे कामकाज करणे अभिप्रेत आहे. मात्र यामधील मोजकेच कामकाज होत असल्याचे चित्र आहे. **पान ४ वर »**

### पुणे, मुंबई, नाशिक, नागपूर पिछाडीवर

राज्यात सर्वांत मोठ्या समजल्या जाणाऱ्या पुणे, मुंबई, नाशिक, नागपूर या बाजार समित्यांनी 'ई-नाम'ला हरताळ फासल्याचे चित्र आहे. मुंबई बाजार समितीने उभारलेली अत्याधुनिक असेईंग लॅब धुळखात पडली आहे. तर पुणे बाजार समितीमध्ये 'ई-नाम'द्वारे लिलावच होत नसल्याचे चित्र आहे.

eNAM

Uttam Fasal Uttam Enaam

# 'ई-नाम'द्वारे १०० कोटी पेमेंटचा दावा

» **पान ३ वरून**

'ई-नाम' कार्यप्रणालीद्वारे खरेदी केलेल्या शेतमालाची संपूर्ण रक्कम खरेदीदार व्यापाऱ्याने शेतकऱ्यास व संबंधित घटकांना ऑनलाइन अदा करायची आहे. कोणत्याही प्रकारची शेतकऱ्याला दिलेली उचल अथवा रोख रक्कम वजा करण्याची तरतूद 'ई-नाम' संगणक प्रणालीमध्ये नाही. यामुळे 'ई-नाम' कार्यप्रणाली शेतकरी हिताची असली, तरी याची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचे चित्र आहे

दरम्यान, राज्यात वणी बाजार समितीने सर्वाधिक ७२ कोटी ५० कोटी 'ई-पेमेंट' केले आहे. तर त्या खालोखाल परभणी, वरोरा, दौंड, भोकर या बाजार समित्यांचे ऑनलाइन पेमेंट प्रत्येकी २ कोटी रुपये तर अमरावती, शिरूर व येवला या बाजार समित्यांनी प्रत्येकी सुमारे १ कोटी रुपये ऑनलाइन पेमेंटद्वारे केले आहेत.

### 'ई-नाम'ची स्थिती

- ६० बाजार समित्यांमध्ये असेईंग लॅब कार्यान्वित
- ५८ बाजार समित्यांमध्ये मॉईश्चर मीटरचा पुरवठा व लॅब उभारणी प्रगतिपथावर
- ७० बाजार समित्यांमध्ये असेईंग सुरु, एकूण ६ लाख ३४ हजार लॉटस् चे असेईंग.
- ७३ बाजार समित्यांद्वारे 'ई-पेमेंट'द्वारे १०६ कोटींचे वितरण
- ११.९० लाख शेतकरी, १९ लाख खरेदीदार, व्यापारी नोंदणी
- १६ हजार ५० अडते नोंदणी, २५८ शेतकरी उत्पादक कंपन्या
- १० शेतकरी उत्पादक कंपन्यांद्वारे २ कोटी ८३ हजार रुपयांची उलाढाल

दै. "पुढारी" दि. २४।२।२०२१.

# ई-नामद्वारे शेतकऱ्यांच्या खात्यात शंभर कोटी जमा

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्यात राष्ट्रीय कृषि बाजार तथा ई-नाम (इलेक्ट्रॉनिक नॅशनल ॲग्रीकल्चर मार्केट) योजनेअंतर्गत बाजार समित्यांमध्ये शेतकऱ्यांना ऑनलाइनद्वारे थेट बँक खात्यात रक्कम देण्याचा सुमारे शंभर कोटींचा टप्पा नुकताच पार झाला आहे. त्यानुसार देशात महाराष्ट्राने तिसरा क्रमांक मिळविला असल्याची माहिती राज्य कृषि पणन मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार यांनी दिली.

राज्यातील ११८ बाजार समित्यांचा समावेश तीन वर्गवारीत करण्यात आला असून, संबंधित बाजार समित्यांमध्ये कामकाज सुरू असल्याचे ते म्हणाले.

राज्यात योजनेतंर्गत ११.९० लाख शेतकऱ्यांची आणि २५८ शेतकरी उत्पादक संस्थांची नोंदणी झाली आहे. ४ हजार ५५६ कोटी इतकी किंमत असलेल्या १५० लाख क्विंटल शेतमालाची ई-लिलाव पद्धतीने विक्री झाली आहे. ७३ बाजार समित्यांमधील ६७८ व्यापाऱ्यांनी ११ हजार ४०४ शेतकऱ्यांना १०६ कोटी ३४ लाख रुपयेइतकी रक्कम ऑनलाईन ई-पेमेंटद्वारे दिलेली आहे. राज्यात वणी बाजार समितीने सर्वाधिक ७२.५० कोटी रुपये ई-पेमेंट केले आहे. परभणी, वरोरा, दौंड, भोकर या समित्यांची ऑनलाइन पेमेंटची आकडेवारी दोन कोटींच्यावर असून अमरावती, शिरुर व येवला समित्यांनी एक कोटी रुपयांच्या वर रक्कम दिलेली असल्याची माहितीही पवार यांनी दिली.

दै. "अॅग्रोवन" दि. २५।२।२०२१



लंडन : यंदाच्या हंगामात रत्नागिरी हापूसची परदेशात निर्यात सुरू झाली असून पहिली पेटी लंडनमधील ग्राहकाला देताना तेजस भोसले.

# रत्नागिरी हापूस पोहोचला लंडनला

राजेश कळंबटे : अॅग्रोवन वृत्तसेवा

**रत्नागिरी :** लंडनस्थित भोसले एंटरप्रायझेस यूके आणि ग्लोबल कोकण यांच्या प्रयत्नांतून रत्नागिरी हापूसची २१ डझनाची पहिली पेटी लंडनमध्ये दाखल झाली. हापूस निर्यातीचा पहिला मान राजापूर तालुक्याला मिळाला. मुहूर्ताच्या पहिल्या डझनला ५१ पौंड म्हणजेच भारतीय चलनानुसार त्याला ५ हजार रुपये विक्रमी दर मिळाला.

यंदाचा आंबा हंगाम प्रतिकूल असला तरीही रत्नागिरी हापूसची जास्तीत जास्त निर्यात व्हावी यासाठी संजय यादवराव यांच्या ग्लोबल कोकण संस्थेने पावले उचलली आहेत. या संस्थेच्या माध्यमातून राजापूर तालुक्यातील तीन बागायतदारांकडील आंबा मुंबईतील निर्यातदाराकडे पाठविण्यात आला. वाशी येथील पणन मंडळाच्या पॅक हाऊसमध्ये त्यावर प्रक्रिया केली गेली. तेथून हवाई मार्गे २१ डझन हापूस लंडनकडे गेला.

लंडनमधील भोसले एंटरप्रायझेसचे तेजस भोसले यांच्याकडे २१ फेब्रुवारीला बॉक्स पोचले. तेजस गेली अनेक वर्षे हापूसची लंडनमध्ये विक्री करत आहेत. गतवर्षी कोरोनाच्या परिस्थितीतही हापूसची चव लंडनवासीयांना चाखता आली. यंदा आंब्यासाठी प्रतिकूल परिस्थिती आहे. तरीही बागायतदार योग्य व्यवस्थापन करून आंबा बाजारात आणण्यासाठी प्रयत्नशील आहेत.

या संदर्भात लंडनस्थित व्यावसायिक तेजस भोसले म्हणाले की, यंदा प्रथमच फेब्रुवारी महिन्यात हापूस दाखल झाला. पहिल्या एक डझनच्या पेटीला ५१ पौंड तर अन्य २० डझनला प्रत्येकी ३० पौंड दर मिळाला आहे. पौंडला भारतीय चलनानुसार सध्या १०१ रुपये मिळतात. भविष्यात जास्तीत जास्त आंबा मार्केटमध्ये आणण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. सर्वांत लवकर आंबा आल्यामुळे विक्रमी दर मिळाला. यापूर्वी जास्तीत जास्त १८ ते २० पौंड डझनला मिळत होते.

संजय यादवराव म्हणाले, की हापूसला युरोपमधील बाजारपेठ मिळवून देतानाच चांगला दरही आम्ही मिळवून देणार आहोत. यंदा हापूस निर्यातीचा पहिला मान राजापूर तालुक्याला मिळाला आहे. तीन बागायतदारांकडील आंबा घेऊन तो मुंबईतील निर्यातदाराच्या मार्फत लंडनला गेला. १५ मार्चनंतर आणखी हापूस तिकडे पाठविण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. प्रथम प्रक्रियेसाठी वाशीतील पणन निर्यात केंद्राचा वापर केला.

दै. "अॅग्रोवन" दि- २६।२।२०२१.

# बाजार समित्यांनी पेट्रोल, सीएनजी पंप उभारावेत

## पणन संचालक सतीश सोनी यांचे निर्देश

**अॅग्रोवन वृत्तसेवा**

**परभणी :** उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीने जिल्हा, राज्य रस्ते किंवा राष्ट्रीय महामार्गावर जागा, तसेच आवश्यक निधी उपलब्ध असलेल्या राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांनी पेट्रोल पंप आणि सीएनजी पंपाची उभारणी करावी, असे निर्देश पणन संचालक सतीश सोनी यांनी दिले आहेत.

राज्यामध्ये एकूण ३०६ कृषी उत्पन्न बाजार समित्या कार्यरत आहेत. गेल्या काही वर्षांपासून बाजार समित्यांची उलाढाल सातत्याने कमी होत असल्याचे दिसत आहे. पर्यायी बाजार व्यवस्थेमुळे कृषी उत्पन्न बाजार समित्यांपुढे अनेक आव्हाने उभी राहिली आहेत. बाजार समित्यांनी परंपरागत पद्धतीने कामकाज चालू ठेवल्यास तसेच उत्पन्नाचे नवनवीन मार्ग न शोधल्यास भविष्यात काही बाजार समित्या अडचणीत येण्याची शक्यता नाकारता येत नाही. पर्यायी बाजार व्यवस्था उभी राहिली असली, तरी अनेक वर्षांपासून बाजार समित्यांचे अस्तित्व आणि कामकाज लक्षात घेता कृषी उत्पन्न बाजार समित्यांनी पणन व्यवस्थेमध्ये शेतकरी, तसेच इतर घटकांसाठी सक्षम पर्याय उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

जिल्हा, राज्य रस्ते किंवा राष्ट्रीय महामार्गावर जागा तसेच आवश्यक निधी उपलब्ध असलेल्या बाजार समित्यांनी पेट्रोल पंप, सीएनजी पंप चालू करण्यासाठी विहित कार्यपद्धतीचा अवलंब करून कार्यवाही करावी. त्यासाठी सक्षम प्राधिकारी, पणन मंडळाची परवानगी घ्यावी, असे निर्देश पणन संचालक सतीश सोनी यांनी सोमवारी (ता. २२) निर्गमित केलेल्या परिपत्रकाद्वारे दिले आहेत.

### काही ठिकाणी उभारणी

बाजार समित्यांच्या उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीने बाजार समित्यांनी उत्पन्नाचे विविध मार्ग शोधणे, त्याकरिता वेगवेगळे उपक्रम राबविणे गरजेचे झाले आहे. राज्यातील काही बाजार समित्यांनी त्यांच्या बाजार आवारात पेट्रोल पंप उभारणी केलेली आहे. त्यामुळे कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांना सुविधा उपलब्ध झाली असून, बाजार समितीस नियमित उत्पन्न मिळत आहे. बाजार समित्यांनी काळानुरूप सीएनजी पंपाची उभारणी केल्यास प्रदूषण कमी होण्यास मदत होईल.

दै. "सामना" दि. २७/५/२०२१.

# शेतकऱ्यांना १०० कोटींचे ऑनलाइन पेमेंट

## 'ई-नाम' योजनेच्या अंमलबजावणीबाबत देशात महाराष्ट्राचा तिसरा क्रमांक

पुणे, दि. २६ (प्रतिनिधी)- केंद्र शासनाने सुरू केलेल्या राष्ट्रीय कृषी बाजार (इलेक्ट्रॉनिक नॅशनल ॲग्रीकल्चर मार्केट (ई-नाम) या योजनेअंतर्गत राज्यातील ११८ बाजार समित्यांमध्ये शेतकऱ्यांना ऑनलाइनव्दारे १०० कोटी रुपयांचा पेमेंटचा टप्पा नुकताच झाला आहे. त्यामुळे देशात आपल्या राज्याचा तिसरा क्रमांक लागला आहे.

शेतकऱ्यांच्या शेतमालास रास्त भाव मिळवून देण्यासाठी केंद्र शासनाने एप्रिल २०१६ पासून ई-नाम ही योजना सुरू केली. राज्यातील ११८ बाजार समित्यांचा तीन टप्प्यांमध्ये या योजनेत समावेश केला आहे. ही योजना शेतकरी व बाजार समित्यांच्या फायद्याची असून, ११८ बाजार समित्यांमध्ये ई-नाम कार्यप्रणालीनुसार आवक गेट एन्ट्री, लॉट मॅनेजमेंट, शेतमालाची गुणवत्ता तपासणे, ई-ऑक्शन करणे, शेतमालाचे वजन, सेल ॲग्रिमेन्ट, सेल बिल व शेतकऱ्यांना ऑनलाइन पेमेंट याप्रमाणे कामकाज होते. राज्यात या योजनेअंतर्गत ११.९० लाख शेतकऱ्यांची व २५८ शेतकरी उत्पादक संस्थांची नोंदणी झाली आहे. ४,५५६ कोटी इतक्या किमतीच्या शेतमालाची ई-लिलाव पद्धतीने विक्री झाली आहे. राज्यातील ७३ बाजार समित्यातील ६७८ व्यापाऱ्यांनी ११,४०४ शेतकऱ्यांना १०६.३४ कोटी इतकी रक्कम आनलाइन ई-पेमेंटद्वारे अदा केली आहे.

शेतमालाच्या गुणवत्ता तपसणीबाबत ई-नामच्या ६० बाजार समित्यांमध्ये लॅब कार्यान्वित केल्या असून नवीन ५८ बाजार समित्यांमध्ये लॅब उभारणीबाबत कार्यवाही सुरू असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार यांनी दिली.

### वणी बाजार समितीचे सर्वाधिक ७२.५० कोटी ई-पेमेंट

▪ राज्यात वणी बाजार समितीने सर्वाधिक ७२.५० कोटी ई-पेमेंट केला आहे. परभणी, वरोरा, दौंड, भोकर या बाजार समित्यांची ऑनलाइन पेमेंटची आकडेवारी २ कोटीच्या वर असून अमरावती, शिरूर व येवला या बाजार समित्यांची ऑनलाइन पेमेंटची आकडेवारी १ कोटीच्या वर गेली आहे.

" कोरोना विषाणू संसर्गजन्य परिस्थितीत सोशल डिस्टन्सिंगचा वापर करून ई-नामद्वारे ई-लिलाव करणे आणि शेतकऱ्यांची रक्कम ई-पेमेंटद्वारे करणे सोईचे झाले. त्यामुळे बाजार समित्यांनी व शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त शेतमालाची विक्री ई-नामद्वारे केली पाहिजे.

- सुनील पवार, कार्यकारी संचालक, कृषी पणन मंडळ.

दै. "पुढारी" दि. २८।२।२०२१.

# बाजार समित्यांच्या व्यवसाय आराखड्यांची गरज

## अभ्यास गटाच्या पहिल्या बैठकीत विविध मुद्द्यांवर ऊहापोह

**पुणे : पुढारी सेवा**

राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीनिहाय पंचवार्षिक व्यवसाय विकास आराखडा तयार करण्यासह शेतमाल आवक वाढविणे, शेतकऱ्यांना सेवा-सुविधा देणे तसेच शेतीपूरक व्यवसायांना चालना देण्यासारख्या उपाययोजनांची गरज आहे. उत्पन्नाचे मार्ग वाढविण्यासाठी गोदामे, शीतगृहांची उभारणी, पाणी-माती परीक्षण प्रयोगशाळा आदींवर भर देऊन अनावश्यक खर्चाला कात्री लावण्यासाठी सांघिक प्रयत्नांची आवश्यकता असल्याचे मत याबाबतच्या अभ्यास गटाच्या पहिल्या बैठकीत सदस्यांनी मांडले.



**माजी पणन संचालक बी. डी. पवार यांचा सत्कार करताना सतीश सोनी व डावीकडे सुनील पवार.**

राज्य कृषी पणन मंडळाच्या सभागृहात पणन संचालक व अभ्यास गटाचे अध्यक्ष सतीश सोनी यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी ही बैठक झाली. त्यास मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार, मुंबई बाजार समितीचे सचिव ए. के. चव्हाण, अविनाश देशमुख, प्रकाश अष्टेकर, सोपान शिंदे, मधुकांत गरड, हिंगणघाट बाजार समितीचे सभापती सुधीर कोठारी, लातूर बाजार समितीचे सभापती ललितकुमार शहा, मुंबई बाजार समितीचे संचालक संजय पानसरे व अन्य सदस्य उपस्थित होते. निवृत्त माजी पणन संचालक बी. डी. पवार हे निमंत्रित सदस्य म्हणून बैठकीस उपस्थित होते. या वेळी त्यांचा सोनी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

बाजार समित्यांनी शेतकऱ्यांना आकर्षित करून शेतमाल आवक वाढवावी, शेतकरी निवास, भोजन व्यवस्था, वैद्यकीय सुविधा, त्वरित पेमेंट, पारदर्शक व्यवहार, शेतकरी सल्ला केंद्र आणि स्पर्धात्मक दर मिळण्यासाठी खरेदीदार व आडत्यांची संख्या वाढविणे, संगणकीकरण कामकाज वाढविणे, शेतमाल तारण योजना राबविण्यासाठी प्रयत्न करण्याचा मुद्दा बैठकीत चर्चिला गेला. समित्यांच्या विकासासाठीचा अंतिम आराखडा एक महिन्यात अभ्यास गटाकडून तयार होईल, अशी माहिती सोनी यांनी बैठकीनंतर दिली.

**खर्चात कपात करणे आवश्यक...**

अभ्यास गटातील सदस्यांनी बाजार समित्यांच्या खर्चात कपात करण्याचा मुद्दा मांडला. अनावश्यक नोकर भरती न करणे, आर्थिक क्षमता नसताना उच्च वेतनश्रेणी न देणे, अवास्तव भेटी- समारंभ खर्चावर नियंत्रण ठेवणे, जाहिरात व देणगी खर्च तसेच वाहन खर्च नियंत्रित ठेवणे, प्रशासकीय खर्चात बचत करणे, काही सेवा खासगी पुरवठादारांमार्फत करून घेणे आदी मुद्द्यांवर विस्तृत चर्चा झाल्याचे सांगण्यात आले.

दै. "अॅग्रोवन" दि. २८।२।२०२१.

# बाजार समित्यांच्या उत्पन्नवाढीसाठी अभ्यास गटाची स्थापना

अॅग्रोवन वृत्तसेवा

**पुणे** : पणन सुधारणांमुळे पारंपरिक कामकाजामध्ये अडकलेल्या बाजार समित्यांपुढे विविध आव्हाने उभी राहत आहेत. या आव्हानांना सामोरे जात बाजार समित्यांचे उत्पन्न वाढविण्याबरोबरच नफ्यात आणण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांसाठी पणन संचालकांच्या अध्यक्षतेखाली १८ सदस्यांच्या अभ्यास गटाची स्थापना करण्यात आली आहे. हा अभ्यास गट उत्पन्नाचे स्रोत वाढीबरोबरच बाजार समित्यांच्या सक्षमीकरणासाठी उपाययोजना सुचविणार आहे.

याबाबत पणन संचालक सतीश सोनी यांनी माहिती दिली. सोनी म्हणाले, "राज्यात ३०६ बाजार समित्या आणि सुमारे ९०० उपबाजार आहेत. पणन सुधारणा, कायद्यातील बदल, मॉडेल अॅक्ट आदी विविध कारणांनी शेतकऱ्यांना पर्यायी बाजारपेठा उपलब्ध झाल्या आहेत. मात्र बाजार समित्यांची उलाढाल सातत्याने कमी होत असल्याचे दिसून येते. यामुळे बाजार समित्यांपुढे अस्तित्व टिकविण्यासाठीची विविध आव्हाने उभी राहिली आहेत.

बाजार समित्यांनी त्यांच्या पारंपरिक कार्यपद्धतीमध्ये बदल न केल्यास आणि उत्पन्नाचे नवीन मार्ग न शोधल्यास बाजार समित्या अडचणीच येण्याची शक्यता आहे. हे टाळण्यासाठी आणि कामकाजातील पारदर्शी बदलांबरोबर नवनवीन उत्पन्नाचे स्रोत निर्माण करण्यासाठी शेतकरी आणि बाजार घटकांसाठी विशेष काम करण्याची गरज आहे."

“ बाजार समित्या, अडते यांनी पारंपरिक मानसिकतेत न राहता शेतकऱ्यांना विश्‍वासार्ह आणि पारदर्शी सेवा दिली तरच शेतकरी बाजार समित्यांमध्ये येणार आहे. तसेच बाजार समिती प्रशासनाने देखील खर्चावर नियंत्रण आणत, लहान लहान बाबींमधून उत्पन्न वाढविले पाहिजे. यासाठी विविध उपक्रम पुणे बाजार समितीमध्ये राबविले जात आहेत.

– **मधुकांत गरड**, प्रशासक, पुणे बाजार समिती सदस्य अभ्यास गट समिती

“ अतिरिक्त उत्पन्नाचा स्रोत म्हणून बाजार समित्यांना पेट्रोल पंप उभारण्यासाठी यापूर्वीच परवानगी देण्यात आली असून, आता नव्या बदलानुसार सीएनजी पंपाची मागणी होऊ लागली आहे. ज्या बाजार समित्यांकडे राज्य आणि राष्ट्रीय महामार्गालगत जागा उपलब्ध आहेत. त्यांनी सीएनजी पंपासाठी अर्ज करावेत. त्यांना १२ (१) नुसार मान्यता देण्यात येईल.

– **सतीश सोनी**, पणन संचालक

दै. "अॅग्रोवन" दि. २८।२।२०२१.

# इंडो-डच फूल संशोधन प्रकल्पाला गती

**अॅग्रोवन वृत्तसेवा**

**पुणे :** इंडो-डच प्रकल्पांतर्गत राज्य कृषी पणन मंडळाच्या तळेगाव दाभाडे येथील राष्ट्रीय सुगीपश्चात तंत्रज्ञान संस्थेमध्ये उभारण्यात येत असलेल्या 'सेंटर फॉर एक्सलन्स' प्रकल्पाला गती मिळाली आहे. कोरोना संकटामुळे रेंगाळलेल्या प्रकल्पात विविध फुलांच्या लागवडीला प्रारंभ झाला असून, येत्या सहा महिन्यांत प्रकल्प पूर्ण होईल, असा विश्वास पणन मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार यांनी व्यक्त केला आहे. या प्रकल्पासाठी नेदरलॅण्ड सरकारच्या तांत्रिक सहकार्य आणि केंद्र सरकारकडून १२ कोटी, तर पणन मंडळाने तीन कोटींचा निधी उपलब्ध आहे.

डच तंत्रज्ञानाने आणि भारतीय तंत्रज्ञानाने फुलांची पॉलिहाउसमधील आणि प्रक्षेत्रावर केलेल्या लागवडीचा तुलनात्मक अभ्यास आणि संशोधन होणार आहे. यामध्ये डच तंत्रज्ञानानुसार कमीत कमी पाणी आणि निविष्ठांचा वापर करून फुलांचे उत्पादन घेतले जाणार आहे. यासाठी एक एकरावर डच तंत्रज्ञानाने संपूर्णतः स्वयंचलित असणारे अत्याधुनिक पॉलिहाउस आणि भारतीय तंत्रज्ञानाचे पॉलिहाउस उभारण्याचे काम पूर्ण झाले आहे.



**तळगाव दाभाडे, जि. पुणे : इंडो-डच प्रकल्पांतर्गत साकारण्यात येत असलेल्या फूल संशोधन प्रकल्पात फुलांची लागवड सुरू असून, त्याची पाहणी राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार आणि अधिकाऱ्यांनी नुकतीच केली.**

तेवढ्याच क्षेत्रावर उघड्या जागेवर प्रक्षेत्रावर गुलाब, जरबेरा, बर्ड ऑफ पॅरडाइज, हेलीकोनिया, कार्नेशन, निशिगंधाच्या लागवडीला प्रारंभ झाला आहे. या विविध वाणांवर विविध वातावरणांत आणि तंत्रज्ञानाचा कोणता परिणाम होतो आणि कोणते उत्पादन दर्जेदार होते. याचा अभ्यास केला जाणार आहे. या अभ्यासामध्ये शेतकऱ्यांना सहभागी आणि प्रशिक्षण दिले जाणार आहे. विविध चाचण्या यशस्वी झाल्यानंतर हे तंत्रज्ञान शेतकऱ्यांना प्रत्यक्ष शेतावर वापरण्यास देण्यात येणार आहे. असे पवार यांनी सांगितले.

### प्रकल्पाची वैशिष्ट्ये

- संपूर्णतः स्वयंचलित तंत्रज्ञान प्रकल्प
- कमीत कमी मनुष्यबळाचा वापर
- डच आणि भारतीय तंत्रज्ञानाचा तुलनात्मक अभ्यास
- कमीत कमी पाणी आणि निविष्ठांचा वापर
- कीड, रोगांचे जैविक व्यवस्थापन तंत्रज्ञान
- आंतरराष्ट्रीय बाजारपेठेशी संलग्न उत्पादन

दै. "अॅग्रोवन" दि. ४/३/२०२१.

# मुंबई बाजार समितीत शेतीमालाची खरेदी-विक्री होणार संगणकीकृत

## बदलत्या पणन कायद्यामुळे अस्तित्व टिकविण्यासाठी प्रयत्न

गणेश कोरे : अॅग्रोवन वृत्तसेवा

**पुणे :** बदलत्या पणन कायद्यांमुळे बाजार समित्यांच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला असताना, आता बाजार समित्या आणि बाजार घटकांनी देखील पारंपरिक व्यवस्थेतून बाहेर पडण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. वर्षानुवर्षे बाजार समित्या आणि अडत्यांवर 'चोर' असल्याचा ठपका पुसून काढण्यासाठी मुंबई बाजार समितीने शेतीमालाचे संपूर्ण व्यवहार संगणकीकृत करण्याच्या दिशेने पाऊल टाकले आहे. यासाठी बाजार समितीने प्रायोगिक तत्त्वावर केलेला प्रयोग यशस्वी झाला असून, लवकरच सविस्तर प्रस्ताव मान्यतेसाठी पणन संचालनालयाकडे पाठविण्यात येणार आहे.

याबाबत बाजार समितीचे ज्येष्ठ संचालक व फळे व्यापारी संघटनेचे अध्यक्ष संजय पानसरे यांनी माहिती दिली. पान ४ वर »

### शेअर मार्केटसारखे दिसणार शेतीमालाचे बाजारभाव

दर तासाला कोणत्या शेतीमालाला काय दर आहेत. किती चढ-उतार आहेत याची माहिती बाजार समितीच्या वेबसाइटसह इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे राज्य, देशपातळीवर पाठविण्यात येणार आहे, असेही पानसरे यांनी सांगितले.

> **शेतकऱ्यांना अधिकाधिक पारदर्शी सेवेसाठी संगणकीकृत आणि पेपरलेस बाजार समिती करण्याचे आमचे प्रयत्न आहेत. यासाठीचे काही प्रयोग यशस्वी झाले असून, टप्प्याटप्प्याने सर्व घटकांच्या समन्वयाने आणि विश्वासात घेऊन, डिजिटल बाजार समिती करण्याचे स्वप्न आहे.**
>
> **- अशोक डक,** सभापती, मुंबई बाजार समिती

## मुंबई बाजार समितीत शेतीमालाची खरेदी-विक्री होणार संगणकीकृत

» पान १ वरून

पानसरे म्हणाले, की बदलत्या पणन कायद्यांमुळे बाजार समित्यांच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. खासगी बाजार समित्या, थेट पणन, संपूर्ण नियमनमुक्ती आदी विविध बदलांमुळे बाजार समितीमधील शेतीमालाची आवक कमी होऊन, बाजार समित्यांचे उत्पन्न कमी होण्याचा धोका आहे. अशा परिस्थितीमध्ये बाजार समित्यांचे अस्तित्व टिकविण्यासाठी विविध प्रयत्न करण्याची गरज आहे. यासाठी आम्ही बाजार समितीमधील संपूर्ण शेतीमालाचे व्यवहार संगणकीकृत करण्याचा प्रयत्न करत आहोत.

संगणकीकरणामध्ये प्रत्येक वाहनांमधील शेतीमालाची प्रवेशद्वारावर संगणकीकृत नोंद होणार आहे. प्रत्येक शेतीमालाचे डाग कोणत्या अडत्याच्या गाळ्यावर आले आहेत, याची नोंद होऊन त्याचा संदेश मोबाईलवर पाठविण्यात येणार आहे. यासाठी व्हॉट्सअॅप, टेलिग्रामसारख्या समाजमाध्यमांवरील अॅपचा वापर केला जाणार आहे. तसेच शेतीमालाची विक्री झाल्यावर जावक गेटवरच त्याची नोंद होऊन, बाजारशुल्क (सेस) ग्राहकांकडून प्रवेशशुल्कांची आकारणी केली जाणार आहे. यामुळे वर्षाच्या शेवटी होणारी बाजार शुल्काची रक्कम दररोज बाजार समितीला मिळणार आहे. तसेच प्रत्येक शेतीमालाचे दर तासाला किती दराने विक्री होत आहे. याचे दर बाजार समितीच्या वेबसाइटवर लाइव्ह असणार आहेत. यामुळे शेतकऱ्यांना शेअर बाजाराप्रमाणे प्रत्येक शेतीमालाच्या दरातील चढउतार कळणार आहे. अशी संकल्पना असून, याचा फायदा शेतकरी, अडते, खरेदीदार, व्यापारी आणि बाजार समितीला होणार आहे. तसेच प्रत्येक तासाचे चढउतार इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे राज्य आणि देशपातळीवर पाठविण्यात येणार आहे.

दै. "महाराष्ट्र टाइम्स"
दि. ४/३/२०२१.

## 'ई-नाम'मध्ये अव्वल

**शिरूर** : 'ई-नाम' योजनेत जिल्ह्यातील शिरूर आणि दौड बाजार समिती अव्वलस्थानी असल्याची माहिती शिरूर बाजार समितीचे सभापती शंकर जांभळकर यांनी दिली. 'शेतकऱ्यांच्या शेतमालाला रास्त भाव मिळवून देण्यासाठी केंद्र सरकारने 'ई-नाम' योजना २०१६ पासून सुरू केली आहे. राज्यातील ११८ बाजार समित्या तीन टप्प्यांत या योजनेत सहभागी झाल्या आहेत. पुण्यासह शिरूर, दौंड, खेड आणि जुन्नर या बाजार समित्यांमध्ये 'ई-नाम' अंतर्गत व्यवहार सुरू आहेत. या योजनेंतर्गत शेतकऱ्यांचे शेतमालाचे पैसे ऑनलाइन पद्धतीने थेट बँकेत जमा होत आहेत,' असे जांभळकर म्हणाले.

दै. "पुढारी" दि. ११/३/२०२१.

# आंबा निर्यात व विक्रीला प्राधान्य

## राज्य कृषी पणन मंडळाकडून नियोजन सुरू; कार्यकारी संचालक सुनील पवार यांची माहिती

पुणे : किशोर बरकाले



पुढारी विशेष

राज्य कृषी पणन मंडळाने आंबा हंगाम २०२१ चे नियोजन केलेले असून निर्यातीबरोबर देशांतर्गत बाजारपेठेत आंबा विक्रीस अधिकाधिक प्राधान्य देण्यात येत आहे. पणन मंडळाच्या अद्ययावत सुविधा केंद्रांचा लाभ घेऊन आंबा निर्यातीस चालना देण्यात येत आहे. देशांतर्गत विक्री व्यवस्थेच्या नियोजनात गुजरात, मध्य प्रदेश, पंजाब, दिल्ली या ठिकाणी थेट आंबा विक्रीचे नियोजन करण्यात आल्याची माहिती मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार यांनी दिली.

आंबा विक्रीकरिता महोत्सव, निर्यातीबाबत कार्यशाळा, शेतकऱ्यांनी निर्यातदार होण्याकामी निर्यात प्रशिक्षण व केंद्र सरकारच्या अपेडा संस्थेच्या सहकार्यातून आंबा खरेदीदार विक्रेता संमेलनही भरविण्यात येत आहे. ज्याद्वारे आंबा उत्पादक शेतकऱ्यांना चांगला दर प्राप्त होऊन ग्राहकांना चांगला आंबा उपलब्ध होण्यास मदत होईल.

पणन मंडळाच्या आंब्याबाबत निर्यातीसाठी अपेडाने विकसित केलेल्या मँगोनेट ऑनलाइन प्रणालीमध्ये नोंदणीकृत शेतकऱ्यांसमवेत सुविधेचे लिंकिंग झालेले आहे. यामुळे निर्यातवृद्धीस मदत होण्याची अपेक्षा आहे. स्थानिक बाजारात हापूस १० एप्रिलनंतर उपलब्ध होईल.

देशातून होणाऱ्या आंबा निर्यातीत केशर ५१ टक्के, बैगनपल्ली ३२ टक्के, हापूस १३ टक्के, तर राजापुरी, पायरी, हिमायत, चिन्ना रसालु, मल्लिका, दशहरी आंब्यांची मिळून ४ टक्के निर्यात होते. गतवर्षी देशातून ४९ हजार ६५९ टन आंब्यांच्या निर्यातीत महाराष्ट्राचा १७ हजार ५५२ टनाचा वाटा आहे. त्यातून राज्याला सुमारे २०८ कोटींचे परकीय चलन मिळाले.

### केशर आंबा निर्यातीची बैठक यशस्वी...

देशातून निर्यात होणाऱ्या आंब्यांमध्ये केशर आंब्यांची आकडेवारी सर्वात जास्त आहे. मंडळाच्या पुढाकाराने ९ मार्चला वाशी येथे केशर आंबा उत्पादक व प्रमुख निर्यातदार यांच्यात बायर-सेलर मीटचे आयोजन झाले. युरोप, अमेरिका, आखाती देश, सिंगापूर, मलेशिया, हाँगकाँग येथील निर्यातदारांनी येथील बैठकीत भाग घेतला. त्यांनी केशर आंबा खरेदीची तयारी दर्शविली असून औरंगाबाद येथे मुख्यालय असलेल्या महाकेशर या केशर आंब्यांच्या उत्पादकांच्या संस्थेने मंडळाच्या मार्गदर्शनाने निर्यातीचे नियोजन सुरू केल्याचे पवार यांनी सांगितले.

लोकमत

हापूस आंबा मोठ्या शहरांमध्ये शेतकऱ्यांमार्फत थेट ग्राहकांना उपलब्ध

# परराज्यातील आंबा महोत्सवामध्ये सहभागी होण्याचे आवाहन

लोकमत न्यूज नेटवर्क

वेंगुर्ला : कोकणातील हापूस आंबा देशातील मोठ्या शहरांमध्ये शेतकऱ्यांमार्फत थेट ग्राहकांना उपलब्ध करुन देण्यासाठी राज्याचे सहकार व पणनमंत्री अध्यक्ष बाळासाहेब पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पणन मंडळाने नियोजन सुरू केले आहे.

देशातील नवी दिल्ली, चंदिगड, अहमदाबाद, सुरत, वडोदरा, पणजी, बेंगलोर, चेन्नई, हैद्राबाद, इंदोर, भोपाळ या शहरांमध्ये आंबा महोत्सवाचे आयोजन करुन हापूस आंब्यास मोठ्या प्रमाणात बाजारपेठ उपलब्ध करुन देण्याबाबत मंत्र्यांनी सूचना दिल्या आहेत.



## बाजारपेठ स्थापनेसाठी प्रयत्न

- परराज्यात हापूस आंब्याकरिता बाजारपेठ स्थापन करण्यासाठी कृषी पणन मंडळातर्फे करण्यात येत असलेल्या प्रयत्नामध्ये कोकणातील शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार यांनी आंबा उत्पादकांना केले आहे. अधिक माहितीसाठी कपिल खामकर यांच्याशी संपर्क साधावा.

परराज्यामधील आंबा महोत्सवामध्ये जे शेतकरी सहभागी होण्यास इच्छुक असतील त्यांनी विहित नमुन्यातील अर्ज, ७/१२ उतारा (मागील ६ महिन्यातील), ओळखपत्र (आधार कार्ड झेरॉक्स) तसेच महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या नावे दहा हजार रुपयांच्या धनाकर्षासह आपला अर्ज महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, विभागीय कार्यालय रत्नागिरी, कृषी उत्पन्न बाजार समिती रत्नागिरी आवार, शांतीनगर, नाचणे, ता.जि.रत्नागिरी येथे सादर करावा.

अर्जासोबत स्टॉलवर उपस्थित राहणाऱ्या कुटुंबातील व्यक्ती व सहकारी यांचे ओळखपत्रासह शिफारस पत्र शेतकऱ्यांनी देणे आवश्यक आहे.

अर्जासोबत भौगोलिक मानांकनाच्या प्रमाणपत्राची झेरॉक्स जोडणे आवश्यक आहे.

दै. "सामना" दि. २०।३।२०२१.

# शेतमाल वाहतुकीसाठी मिळणार अनुदान

पुणे, दि. १९ (प्रतिनिधी)– शेतमालाच्या आंतरराज्य व्यापारास चालना देण्यासाठी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाने आंतरराज्य शेतमाल व्यापार रस्ते वाहतूक अनुदान योजना सुरू केली आहे. ही योजना ३१ मार्च २०२३ पर्यंत असणार आहे. अनुदानासाठी राज्यातील नोंदणीकृत शेतकरी उत्पादक कंपन्या आणि शेतमाल उत्पादकांच्या सहकारी संस्था पात्र असणार आहेत. या योजनेत रस्ते वाहतूक भाड्यात ५० टक्के अनुदान मिळणार आहे.

शेतकरी उत्पादक कंपन्या व सहकारी संस्था बऱ्याचदा वाहतूक खर्च परवडत नसल्यामुळे नाशवंत माल परराज्यात पाठवत नाहीत. त्यामुळे आंतरराज्य व्यापारास चालना देण्यासाठी कृषी पणन मंडळाने शेतमाल व्यापार रस्ते वाहतूक अनुदान योजना सुरू केली आहे. परराज्यात शेतमाल वाहतूक करून प्रत्यक्ष विक्रीसाठी योजना लागू आहे. नोंदणीकृत शेतकरी उत्पादक कंपन्या व शेतमाल उत्पादकांच्या सहकारी संस्था अनुदानासाठी पात्र ठरतील. पात्र संस्थांनी सभासदांचा उत्पादित माल परराज्यात पाठविण्यापूर्वी पणनच्या विभागीय कार्यालयाची मान्यता

## पणन मंडळाची योजना

आवश्यक आहे. रस्ते वाहतूक होणाऱ्या शेतमालावरच अनुदान दिले जाईल. महाराष्ट्रातून इतर राज्यांत केलेल्या एकेरी वाहतुकीस सदरचे अनुदान मिळणार आहे. शेतमाल विक्री रकमेतून खर्च कपात करून उर्वरित रक्कम सभासदांच्या खात्यावर वर्ग केल्यानंतर अनुदानासाठी अर्ज करता येईल. विक्रीनंतर अनुदानाचा प्रस्ताव ३० दिवसांत विभागीय कार्यालयाकडे पाठवावा. एका खेपेत किमान तीन सभासदांचा एकत्रित माल असणे आवश्यक आहे. प्रत्यक्ष वाहतूक केलेल्या अंतरानुसार ५० टक्के किंवा २० हजार ते ७५ हजार रुपये यापैकी कमी असलेली रक्कम अनुदान म्हणून दिली जाईल. ३५० किलोमीटरपेक्षा कमी अंतरावरील शेतमाल वाहतुकीस अनुदान मिळणार नाही. एका आर्थिक वर्षात पात्र लाभार्थी संस्थेस जास्तीत जास्त ३ लाखांचे अनुदान मिळू शकेल. अधिक माहितीसाठी msamb.com या संकेतस्थळावर भेट देण्याचे आवाहन पणन मंडळाच्या देशांतर्गत व्यापार विकास विभागाने पत्रकाद्वारे केले आहे.

**या फळांना योजना लागू**

आंबा, केळी, डाळिंब, द्राक्ष, संत्रा, मोसंबी, कांदा, टोमॅटो, आले व भाजीपाला या नाशवंत पिकांसाठी ही योजना लागू राहील. या व्यतिरिक्त नाशवंत शेतमाल परराज्यात विक्री करायचा असेल तर पणन मंडळाची पूर्वी मान्यता घेणे आवश्यक आहे.

दै. "ॲग्रोवन" दि. २१/३/२०२१.

# बाजार समित्यांच्या उत्पन्नासाठी प्रकल्प हाती घेणार : सोनी

ॲग्रोवन वृत्तसेवा

पुणे : "राज्यातील बाजार समित्या आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हाव्यात, या साठी सरकारी स्तरावर नव्याने धोरणांची आखणी सुरु आहे. बाजार समित्यांना पर्यायी उत्पन्न व्हावे, या साठी विविध प्रकल्प हाती घेण्यात येत आहेत", अशी माहिती पणन संचालक सतीश सोनी यांनी दिली.

बारामती कृषी उत्पन्न बाजार समितीसह काही सहकारी संस्थांना सोनी यांनी भेट दिली. त्या वेळी त्यांनी ही माहिती दिली. सहाय्यक निबंधक एस. एस. कुंभार, समितीचे सचिव अरविंद जगताप यावेळी उपस्थित होते.

सोनी म्हणाले, "बारामती कृषी उत्पन्न बाजार समिती शेतकरी हित जोपासत शेतकऱ्यांना उपयुक्त विविध प्रकल्प राबवत आहे. राज्यातील बाजार समित्यांनी बारामतीला भेट देऊन येथील अनुकरण करावे. बारामतीची समिती शेतकऱ्यांबरोबरच व्यापारी व निर्यातदारांच्या दृष्टीने विविध महत्त्वाचे प्रकल्प राबवत आहे. त्यामुळे दरवर्षी बाजार समितीच्या उत्पन्नात वाढ होत आहे."



**राज्यातील बाजार समित्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी समितीच्या आवारात व्यावसायिक गाळे वाढवणे, विजेची बचत करण्याच्या दृष्टीने सौर ऊर्जा प्रकल्प राबविण्यासह, सीएनजी पंप, पेट्रोल पंप उभारणे, बाजार समितीकडे जर पैसा नसेल, तर स्वारस्य अभिव्यक्ती राबवून काही करता येईल का, या संदर्भात विचार सुरु आहे**

**– सतीश सोनी.** पणन संचालक

दै. "पुढारी"
दि. २१/३/२०२२.

# पणनची परराज्यात शेतमाल वाहतुकीसाठी अनुदान योजना

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्यात उत्पादित होणाऱ्या नाशवंत शेतमालाला शेतकरी उत्पादक कंपन्या व शेतमाल उत्पादकांच्या सहकारी संस्थांमार्फत आंतरराज्यीय व्यापारास चालना देण्यासाठी राज्य कृषी पणन मंडळाने पावले उचलली आहेत. त्यासाठी शेतमाल रस्ते वाहतुकीच्या भाड्यामध्ये पन्नास टक्के अनुदान योजना सुरू करण्यात आली आहे.

योजना केवळ महाराष्ट्रातून रस्ते वाहतुकीद्वारे परराज्यात शेतमाल वाहतूक करून प्रत्यक्ष विक्री करण्यात येणाऱ्या व्यवहारासाठी लागू राहील. राज्यातील नोंदणीकृत शेतकरी उत्पादक कंपन्या व शेतमाल उत्पादकांच्या सहकारी संस्था योजनेअंतर्गत अनुदान मिळण्यासाठी पात्र असतील. अर्जदार संस्थेने पणन मंडळाची पूर्वमान्यता घेणे आवश्यक आहे. ही योजना आंबा, केळी, डाळिंब, द्राक्षे, संत्रा, मोसंबी, कांदा, टोमॅटो, आले व भाजीपाला या नाशवंत पिकांसाठीच लागू राहील, अशी माहिती पणन मंडळाचे देशांतर्गत व्यापार विकास विभागाचे सहायक सरव्यवस्थापक मंगेश कदम यांनी कळविली आहे.

दै. "ॲग्रोवन" दि. ८।४।२०२१.

# तीन दिवसांवर बाजार समिती 'बंद'ला तंबी

## पणन संचालकांनी काढले परिपत्रक

ॲग्रोवन वृत्तसेवा

नाशिक : मार्चअखेर विविध कारणे सांगून बाजार समित्या बंद ठेवण्यात आल्या. परिणामी, शेतकऱ्यांच्या शेतीमालाची नासाडी होण्यासह कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले. 'ॲग्रोवन'ने हा प्रकार समोर आणला होता. ही बाब पणन संचालनालयाने गांभीर्याने घेत बाजार समित्यांमध्ये तीन किंवा तीन दिवसांपेक्षा जास्त कालावधीसाठी कामकाज बंद राहणार नाही, या आशयाचे परिपत्रक काढले आहे. त्यातून पणन संचालक सतीश सोनी यांनी राज्यातील बाजार समित्यांची कानउघाडणी केली आहे. पान ४ वर »

ॲग्रोवन इफेक्ट

### बाजार समित्यांना केलेल्या सूचना

- बाजार समितीने वर्षाच्या सुरुवातीलाच साप्ताहिक सुट्ट्या तसेच इतर सुट्ट्या जाहीर कराव्यात. सुट्ट्यांचे वर्षभराचे दिवस निश्चित करावेत
- शेतीमाल खरेदी- विक्रीचे सौदे करण्याचा कालावधीही निश्चित करून पुरेसा वेळ दिला जावा. पान ४ वर »

**"बाजार समित्या या शेतकऱ्यांचे हित जपण्यासाठी असून कायद्याचे पालन करण्यास बांधील आहेत. जर त्यांनी सूचनांचे पालन केले नाही तर नियमनाच्या कायद्याने कारवाई करू. जर कुणाला यात त्रुटी वाटल्यास सूचना आल्यानंतर त्यास दुरुस्त्या करू. मात्र शेतकऱ्याच्या शेतीमाल विक्रीत अडचणी येणार नाही हे महत्त्वाचे राहील. अनेक बाजार समित्यांनी आठ दिवस कामकाज बंद ठेवले हे शासनाला मान्य नाही.**

**– सतीश सोनी,** पणन संचालक

# तीन दिवसांवर बाजार समिती 'बंद'ला तंबी

» पान १ वरून

काही बाजार समित्या धार्मिक सण, उत्सव आणि जोडून आलेल्या साप्ताहिक सुट्ट्या यामुळे सलग तीन दिवस किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीसाठी कामकाज बंद ठेवतात. तर काही बाजार समित्यांमध्ये यात्रा, अमावास्या, व्यापाऱ्यांचा दौरा, आर्थिक वर्षअखेरचा दिवस, विवाह समारंभ तर 'मार्च अखेर' सांगून २ ते

३ दिवस किंवा त्यापेक्षाही जास्त कालावधीसाठी कामकाज बंद ठेवतात. बाजार समित्या अधिक दिवस बंद राहिल्यामुळे शेतीमालाचे नुकसान, दरात घसरण यासह पुरवठा साखळीवरही परिणाम होतो. तर ग्राहकांना वाढीव दराने शेतीमाल खरेदी करावा लागतो. पुन्हा कामकाज सुरू होऊन आवक वाढून दर पडल्याने शेतकऱ्यांचेच नुकसान होते. लिलावाचे विनियमन व देखरेख करण्याचे बाजार समित्यांचे कर्तव्य असताना त्यास हरताळ फासत असल्याचे वारंवार दिसून येत आहे. त्यामुळे परिपत्रक काढून राज्यातील बाजार समित्यांना सूचना करण्यात आल्या आहेत. हा आदेश व्यापाऱ्यांच्या संदर्भात असल्याने माथाडी व

ट्रान्स्पोर्ट घटकाला पण यात समाविष्ट करून घ्यावे, अशी मागणी व्यापाऱ्यांची असल्याचे समजते.

### बाजार समित्यांना केलेल्या सूचना

- आगामी वर्षाचे कॅलेंडर तयार करून जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांची ३१ मार्च पूर्वी मान्यता घ्यावी
- अचानक काही कारणांसाठी बाजार बंद ठेवणे आवश्यक असल्यास, त्याबाबत पूर्वसूचना देण्यात याव्यात.
- व्यापाऱ्यांचे वैयक्तिक कारण असेल, तर संबंधित व्यापारी सुट्टी घेऊ शकेल. परंतु कोणत्याही परिस्थितीत सर्व व्यापारी एकाच दिवशी शेतीमाल खरेदीचे व्यवहार बंद ठेवणार नाहीत.
- सुट्टीच्या दिवसाव्यतिरिक्त इतर दिवशी व्यापाऱ्यांनी बंद ठेवल्यास अशा व्यापाऱ्यांवर बाजार समितीने त्वरित कारवाई करावी. तसेच बाजार चालू राहील यासाठी पर्यायी व्यवस्था बाजार समितीने करावी.
- शेतीमाल खरेदी, विक्री सौदे बंद असल्याचे दिवस वर्षाच्या सुरुवातीलाच जाहीर करून त्याबाबत सूचना प्रसिद्ध कराव्यात.

### जिल्हा उपनिबंधकांची मान्यता आवश्यक

बाजार समितीने वर्षभराच्या नियोजनाबाबत ग्रामपंचायत, स्थानिक स्वराज्य संस्था, नगरपालिका, महापालिका, तहसील, पंचायत समिती यांचे कार्यालयासदेखील सूचित करण्यात यावे. बाजार समित्यांनी आर्थिक वर्ष सन २०२१-२२ च्या सुट्ट्यांबाबत ३० एप्रिल २०२१ पर्यंत संबधित जिल्हा उपनिबंधक यांची मान्यता घ्यावी लागणार आहे. जिल्ह्यातील सर्व बाजार समित्यांमध्ये कार्यवाहीबाबतचा जिल्हानिहाय अहवाल जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांनी दरवर्षी १० एप्रिलपर्यंत सादर करावा लागणार आहे.

दै. "ॲग्रोवन" दि. ९।४।२०२१.

महाॲग्रो

शुक्रवार, ९ एप्रिल २

सकाळ ॲग्रोव

# बाजार समित्या टाकणार 'कात'

## सक्षमीकरणासाठी अभ्यास गटाकडून शिफारशी सादर

गणेश कोरे : ॲग्रोवन वृत्तसेवा

पुणे : पणन सुधारणांमुळे होणाऱ्या संपूर्ण शेतीमालाच्या नियमनमुक्तीनंतर बाजार समित्यांच्या उत्पन्नाचे स्रोत कमी होऊन, बाजार समित्यांचे उत्पन्न घटणार आहे. परिणामी बाजार समित्यांच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण होणार आहे. बाजार समित्यांचे अस्तित्व टिकविण्यासाठी आणि सक्षमीकरणासाठी विविध शिफारशी अभ्यास गटाने आज (ता. ८) सहकार व पणन मंत्री बाळासाहेब पाटील यांना सादर केल्या आहेत. या शिफारशींचा धोरणात्मक निर्णय लवकरच होण्याची शक्यता आहे. या शिफारशींमुळे बाजार समित्यांना देखील आपली पारंपरिक कार्यपद्धतीत बदल करावा लागणार आहे.

केंद्र सरकारच्या नवीन कृषी आणि पणन कायद्यांमुळे संपूर्ण शेतीमाल बाजार समित्यांच्या नियमातून मुक्त होणार आहे. यामुळे बाजार समित्यांमधील शेतीमालाची आवक कमी होऊन, शेतीमालाच्या खरेदी-विक्री व्यवहारांवरील मिळणाऱ्या शुल्कांमध्ये देखील घट होऊन, बाजार समित्यांचे उत्पन्न घटणार आहे. यामुळे बाजार समित्यांच्या अस्तित्वावरच प्रश्न निर्माण होणार असून, त्यांच्या सक्षमीकरणासाठी विविध उपाययोजना करण्यासाठी पणन संचालक सतीश सोनी यांच्या अध्यक्षतेखाली १५ सदस्यांच्या अभ्यास गटाची स्थापना करण्यात आली होती.

या अभ्यास गटाच्या विविध बैठकांमधून विविध उपाययोजनांच्या शिफारशी राज्य शासनाला करण्यात आल्या आहेत. या शिफारशींवर राज्य शासन बाजार समित्यांच्या सक्षमीकरणासाठी धोरण आखले जाण्याची शक्यता आहे. या धोरणामुळे बाजार समित्यांचे अस्तित्व कायम राखण्यात मदत होणार आहे. मात्र या नव्या धोरणामुळे बाजार समिती घटकांना आपल्या पारंपरिक कार्यपद्धतीमध्ये आमूलाग्र बदल करावा लागणार आहे. तरच बाजार समित्या आणि घटकांचे अस्तित्व टिकणार आहे.



**पुणे : बाजार समित्या सक्षमीकरणासाठीच्या अभ्यास गटांच्या शिफारशींचा अहवाल पणन संचालक सतीश सोनी यांनी सहकार व पणन मंत्री बाळासाहेब पाटील यांना आज (ता. ८) सादर केला. या वेळी राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार, पणन सहसंचालक (बाजार समिती) विनायक कोकरे आदि मान्यवर उपस्थित होते.**

### ...या आहेत शिफारशी

- बाजार समित्यांचे संगणीकरण करणे
- संपूर्ण नियमनमुक्तीनंतर शेतीमालाची आवक वाढविण्यासाठी बाजार समित्यांनी स्वतः शेतीमाल संकलित करणे.
- शेतीमालाची बांध ते ग्राहकांपर्यंतचा प्रवास संगणकीकरणाद्वारे देखरेख ठेवणे
- बाजार समित्यांमधील शेतीमालाच्या व्यवहारात स्पर्धावाढीसाठी खरेदीदार व अडत्यांची संख्या वाढविणे.
- बाजार समितीच्या बाजार शुल्काची गळती रोखण्यासाठी व्यापाऱ्यांची सातत्याने दफ्तर तपासणी करणे
- बाजार समित्यांमधील अतिरिक्त ठेवीं ४-५ टक्के दराने न ठेवता, ६ टक्के दराने शेतीमाल तारण योजनेसाठी वापराव्यात.
- गोदामे बांधून शेतीमाल साठवणूक आणि तारण योजना राबविण्यात यावी.
- शेतीमालाशिवाय इतरांना गोदामे भाडेतत्त्वावर देण्यास परवानगी द्यावी.
- शेतीमाल तारण योजनेसाठी जागतिक बँककडून कमी व्याजदराने कर्जपुरवठा.
- बाजार शुल्काच्या पुनर्रचनेनसह शेतीमालनिहाय अडतीचे दर ठरवावे
- बाजार शुल्क प्रवेशद्वारावरच दैनंदिन संकलित करावे. (सध्या दरवर्षी वसूल केला जातो. यामध्ये गैरव्यवहार होतो.)
- बाजार समित्यांनी शेअर मार्केटप्रमाणे महत्त्वाच्या शेतीमालाच्या दराचे डिजिटल माध्यमाद्वारे प्रकाशित करावे.
- प्रत्येक बाजार समितीने स्वतःचे मोबाईल ॲप विकसित करून, ते सर्व शेतकऱ्यांना उपलब्ध करून देणे.
- लिलावाची माहिती शेतकऱ्यांना मोबाईल फोनवर संदेशाद्वारे देण्यात यावी.
- बाजार समित्यांमध्ये शीतगृहे आणि प्रक्रिया उद्योग उभारावेत.
- भाडेतत्त्वावरील दिलेले भूखंड आणि गाळे यांचे रेडिरेकनर दरानुसार भाडेआकारणी आणि करारनामे करावेत.
- भूखंड आणि गाळ्यांचे करारनामे ९९ वर्षाएवजी ३० वर्षांचे करावेत.
- भूखंड, गाळ्यांचे परस्पर हस्तांतरावर बंदी आणणे. हस्तांतर शुल्कात वाढ करणे.
- सर्व प्रकारच्या परवाना शुल्कामध्ये बाजार समितीच्या दर्जानुसार वाढ करावी.
- हरित ऊर्जेच्या वापरातून खर्चात बचत करावी. (सौरऊर्जा प्रकल्प, कचऱ्यावरील वायुनिर्मिती प्रकल्प उभारावेत.)
- बाजार समितीच्या जागांवर व्यावसायिक संकुले उभारणे (मॉल, हॉटेल)
- शेतीमाल निर्यात सुविधा केंद्रे उभारावीत.
- शेतीमालनिहाय उपबाजार उभारावेत
- बाजार समित्यांच्या खर्चात कपात करून उत्पन्न वाढवा.

दै. "ॲग्रोवन" दि. १२/४/२०२१.

# समन्वय ठेऊन बाजार समित्या सुरु करा

## पणन संचालकांचे आदेश

ॲग्रोवन वृत्तसेवा

**पुणे : सुट्टीच्या टाळेबंदीमध्ये अत्यावश्यक सेवेत असल्याने शहरांमधील अन्नधान्य, फळे भाजीपाल्याचा पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी सर्व बाजार समित्या आणि जिल्हा उपनिबंधकांना बाजार समित्या स्थानिक पोलिस आणि महसूल प्रशासनासोबत समन्वय साधत सुरु करण्याचे आदेश संचालक सतीश सोनी यांनी (ता.१२) पुन्हा दिले आहेत.**

पणन संचालक सोनी यांनी जिल्हा उपनिबंधक आणि बाजार समित्यांना दिलेल्या आदेशात म्हटले आहे,''कोरोना विषाणूच्या फैलावाच्या पार्श्वभूमीवर आपल्या जिल्ह्यातील काही बाजार समित्या बंद ठेवल्या असल्याचे निदर्शनास आलेले आहे. कोरोनामुळे टाळेबंदीची परिस्थिती उद्भवली असली तरी अन्न, फळे भाजीपाला पुरवठा साखळी सुरळीत राहणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे राज्य शासनाच्या आदेशानुसार कोरोना फैलाव रोखण्यासाठीच्या आवश्यक त्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करून राज्यातील बाजार समित्या सुरू ठेवणे आवश्यक आहे. तसेच राज्य शासनाने देखील जारी केलेल्या प्रश्नांचे निरसन केलेले आहे. ते सोबत पाठवीत आहे. त्याची अंमलबजावणी करावी.''

### जेथे प्रशासक आहेत तेथे...

ज्या बाजार समित्यांवर शासकीय अधिकारी हा शासन नियुक्त प्रशासक किंवा सचिव म्हणून कार्यरत आहे अशा प्रशासक, सचिव यांनी विशेष लक्ष देऊन काळजी घेणे आवश्यक आहे. बाजार समित्यांमध्ये गर्दी होऊ नये यासाठी शेतमालनिहाय चक्राकार पद्धतीने बाजार समित्या सुरु ठेवण्याच्या उपाययोजना कराव्यात, असे श्री. सोनी यांनी आदेशात म्हटले आहे.



**अत्यावश्यक सेवेत असून देखील बाजार समित्या बंद**

पुण्यात समिती प्रशासनाच्या हतबलतेने शेतकरी संकटात

ॲग्रोवन : १० एप्रिल २०२१

जिल्हा उपनिबंधकांनी आपल्या जिल्हा व शहर पोलिस जिल्हाधिकारी, मनपा आयुक्त यांच्याशी समन्वय साधत सहकार्य घेऊन आपल्या जिल्ह्यातील बाजार समित्या सुरू राहतील याकडे कटाक्षाने लक्ष देणे आवश्यक आहे.

दै. "ॲग्रोवन" दि. १६/४/२०२१.

पश्चिम महाराष्ट्र

# आवारात गर्दी नियंत्रणासाठी प्रभावी उपाययोजना करा

## पणन संचालक सोनी : पुणे बाजार समितीला दिली भेट

ॲग्रोवन वृत्तसेवा



पुणे : कोरोनाच्या टाळेबंदीच्या पार्श्वभूमीवर पणन संचालक सतीश सोनी यांनी गुरुवारी (ता. १५) पुणे बाजार समितीमधील फळे, भाजीपाला विभागाला भेट देऊन पाहणी केली. या वेळी बाजार समिती प्रशासक मधुकांत गरड यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

पुणे : 'ब्रेक द चेन' मोहिमेअंतर्गत कोरोना फैलावाची साखळी तोडायची आहे. यासाठी राज्य सरकार कडक अंमलबजावणी करत आहे. शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये आणि शहरांमधील फळे, भाजीपाला पुरवठा सुरळीत राहण्यासाठी शेतीमाल बाजारपेठ सुरू ठेवल्या असल्या तरी बाजार समित्या आवरातील गर्दी नियंत्रणासाठी केलेल्या उपयोजना चांगल्या असून, त्या अधिक प्रभावी करून गर्दी नियंत्रित करण्याच्या सूचना पणन संचालक सतीश सोनी यांनी दिल्या.

बुधवार (ता.१४)पासून सुरू झालेल्या कडक निर्बंधांच्या पार्श्वभूमीवर पणन संचालक सोनी यांनी गुरुवारी (ता.१५) पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीमधील फळे, भाजीपाला, भुसार विभागाला भेट देऊन उपाययोजनांची माहिती घेतली. या वेळी बाजार समिती प्रशासक मधुकांत गरड, सहसचिव सतीश कोंडे, सहायक सचिव बाळासाहेब गायकवाड, विभागप्रमुख बाबा बिबवे, दत्ता कळमकर उपस्थित होते.

या वेळी सोनी म्हणाले, "कोरोना विषाणूच्या फैलावाच्या पार्श्वभूमीवर शासनाने कडक निर्बंध लावले आहेत. या निर्बंधातून अत्यावश्यक सेवेतून बाजार समिती आणि शेतमालाला वगळले असले, तरी बाजार समित्यांमधील गर्दी नियंत्रणासाठी मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. पुणे बाजार समितीने देखील विविध उपाययोजना करत गर्दी नियंत्रणात ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. यामध्ये शेतीमालाचे व्यवहार हे पहाटे तीन ते सात या वेळेतच ठेवले आहेत. हा कालावधी आणखी कमी करण्याच्या सूचना केल्या. पहाटे तीनच्या ऐवजी मुंबई बाजार समितीसारखे रात्री एक वाजता बाजार सुरू करण्याची सूचना केली. तसेच गर्दी नियंत्रणासाठी आणखी कडक उपाययोजना करण्याच्या सूचना केल्या. तसेच फळे, भाजीपाला विभागातील अडत्यांसोबत विविध शेतीमालाच्या दरांबाबत माहिती घेतली."

दै. "पुण्यनगरी"
दि. १८।४।२०२१.

# कृषी पणन मंडळाचा ऑनलाइन आंबा महोत्सव सुरू

। पुणे : प्रतिनिधी

कोरोना प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर थेट आंबा उत्पादक व ग्राहकांची भेट घडवून आणण्यासाठी महाराष्ट्र राज्य कृषी मंडळामार्फत सुविधा देण्यात येत असून ऑनलाइन आंबा महोत्सव सुरू करण्यात आला असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार यांनी दिली.

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळामार्फत दर वर्षी उत्पादक ते ग्राहक थेट विक्री योजनेंतर्गत आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. विक्री व्यवस्थेमधील मध्यस्थांची संख्या कमी करून शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव व ग्राहकांना रास्त दरात चांगल्या गुणवत्तेचा माल मिळावा या उद्देशाने या महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. यंदा कोरोनाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे पणन मंडळाचे खरेदी-विक्रीकरिताचे ऑनलाइन पोर्टल कार्यरत करण्यात आले असून यावर आंबा उत्पादक तसेच ग्राहक नोंदणी करू शकतात. याद्वारे गृहनिर्माण संस्थेमधील जास्तीत जास्त सभासदांनी एकत्रित नोंदणी केल्यास कोकणातील आंबा उत्पादकांना थेट सोसायटीमध्ये दर्जेदार आंबा पुरविणे शक्य



होणार आहे.

चालू वर्षी रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड या जिल्ह्यांतील हापूस आंबा उत्पादकांबरोबरच मराठवाड्यातील केशर आंबा उत्पादकही सहभागी होणार आहेत. पणन मंडळाकडे कोकणातील बहुतांश आंबा उत्पादकांची नोंदणी प्रक्रिया पूर्ण झालेली असून आंबा विक्री सुरू झालेली आहे. चालू वर्षी मराठवाड्यातील महाकेशर संघाद्वारे मोठ्या प्रमाणावर राज्यातील केशर आंबा उत्पादकांना एकत्र आणले असून त्यांनीही पोर्टलवर नोंदणी करावी, असे आवाहन कृषी पणन मंडळाचे सरव्यवस्थापक दीपक शिंदे यांनी केले.

गतवर्षी सुमारे ६५ हजार डझन आंबा या पोर्टलद्वारे विक्री करण्यात आला होता. तरी या वर्षीही ग्राहकांनी जास्तीत जास्त नोंदणी करावी, जेणेकरून ग्राहकांना दर्जेदार आंबा उपलब्ध होईल, असेही शिंदे यांनी सांगितले.

दै. "महाराष्ट्र टाईम्स" दि. १६।४।२०२१.

# पणन मंडळाच्या ऑनलाइन आंबा महोत्सवास सुरुवात

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

राज्य कृषी पणन मंडळामार्फत दर वर्षी 'उत्पादक ते ग्राहक थेट विक्री' योजनेंतर्गत आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. त्यानुसार यंदाही ऑनलाइन आंबा महोत्सवाला सुरुवात झाली आहे. चांगल्या दर्जेदार आंब्यांसाठी ग्राहकांनी पणन मंडळाच्या https://bs.msamb.com या खरेदी-विक्रीसाठीच्या ऑनलाइन पोर्टलवर जाऊन नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

खरेदी- विक्री व्यवस्थेतील मध्यस्थांची संख्या कमी करून शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव; तसेच ग्राहकांना रास्त दरात चांगल्या गुणवत्तेचा आंबा मिळावा, या उद्देशाने या महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. करोनाच्या पार्श्वभूमीवर थेट आंबा उत्पादक व ग्राहकांची भेट घडवून आणण्यासाठी पणन मंडळाने ऑनलाइन सुविधा देण्यास सुरुवात केली आहे. पणन मंडळाच्या वेबसाइटद्वारे गृहनिर्माण संस्थेतील जास्तीत जास्त रहिवाशांना एकत्रित नोंदणी केल्यास कोकणातील आंबा उत्पादकांना थेट सोसायटीत दर्जेदार आंबा पुरविणे शक्य होणार आहे.

'यंदा रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड या जिल्ह्यातील हापूस आंबा उत्पादकांबरोबरच मराठवाड्यातील केशर आंबा उत्पादकही सहभागी होणार आहेत. पणन मंडळाकडे कोकणातील बहुतांश आंबा उत्पादकांची नोंदणी प्रक्रिया पूर्ण झाली असून, आंबा विक्री सुरू झाली आहे,' अशी माहिती पणन मंडळाचे सरव्यवस्थापक दीपक शिंदे यांनी केले आहे.

'गेल्या वर्षी सुमारे ६५ हजार डझन आंबा या पोर्टलद्वारे विक्री करण्यात आला होता. या वर्षीही ग्राहकांनी जास्तीत जास्त नोंदणी करावी,' असे शिंदे यांनी सांगितले.



संग्रहित छायाचित्र

### केशर आंब्यासाठी नोंदणीचे आवाहन

'या वर्षी मराठवाड्यातील महाकेशर संघाद्वारे मोठ्या प्रमाणावर राज्यातील केशर आंबा उत्पादकांना एकत्र आणले असून, त्यांनीही पोर्टलवर नोंदणी करावी,' असे आवाहन पणन मंडळाचे सरव्यवस्थापक दीपक शिंदे यांनी केले आहे.

CMYK

दै. "सकाळ" दि. २०/४/२०२१.

# पंधराशे डझन आंबा रत्नागिरीतून निर्यात

## दिल्लीत धाडले साडेपाच हजार डझन

**रत्नागिरी, ता. १९ :** कोरोनातील संचारबंदीचा परिणाम हापूसच्या निर्यातीवर होऊ नये यासाठी प्रयत्न सुरू आहेत. रत्नागिरीतील आंबा प्रक्रिया केंद्रातून महिनाभरात एक हजार ६६४ डझन आंबा लंडन, कॅनडा व कतारला निर्यात झाला. त्याचबरोबर दिल्लीमध्ये पाच हजार ४०० डझन आंबा पाठविला आहे.

कोकणातील रत्नागिरी, सिंधुदुर्ग या दोन जिल्ह्यातून सर्वाधिक आंबा वाशी बाजारपेठेत जातो. तेथून अनेक देशांमध्ये आंब्याची निर्यात केली जाते; परंतु, दोन वर्षांपासून रत्नागिरीतील पणन मंडळामार्फत हापूसची परदेशात थेट निर्यात करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. या केंद्रामध्ये परदेशात पाठवण्यात येणाऱ्या आंब्याचे 'वॉशिंग', 'ब्रशिंग' आणि 'क्लिनिंग' करण्यात येते. यानंतर याचे 'ए' आणि 'बी' श्रेणीमध्ये विभाजन केल्यानंतर पॅकिंग केले जाते.

**आंब्याची निर्यात** (डझनात)

| | |
|---|---|
| ४२६ कतार | ७८८ लंडन |
| ४५० कॅनडा | ५,४०० दिल्ली |

परदेशात आंबा पाठवणाऱ्या शेतकऱ्यांना चांगला आर्थिक फायदा होतो. या आंब्याला दरही चांगला मिळतो. याशिवाय आडतेदार नसून आंबा थेट निर्यातदार खरेदी करतात. शेतकऱ्यांना पॅकिंग आणि वाहतुकीचा खर्च येत नाही, तसेच आंब्याचे दुसऱ्याच दिवशी मिळतात. सध्या ७०० ते ८५० रुपये डझनने आंब्याची खरेदी करण्यात येते. आतापर्यंत कतारला ४२६ डझनची निर्यात झाली. कॅनडा ४५० डझन, लंडनला ७८८ डझनची निर्यात करण्यात आली. दिल्लीला पाच हजार ४०० डझन आंबा कंटेनरमधून पाठवण्यात आला.

दै. ॲग्रोवन दि. २०।४।२०२१.

# कृषी पणन मंडळाकडून ऑनलाइन आंबा महोत्सव सुरू

ॲग्रोवन वृत्तसेवा

पुणे : कोरोना संकटातही आंबा उत्पादक शेतकऱ्यांच्या हापूस आणि केशर आंब्याला ग्राहक मिळावा आणि ग्राहकांना रास्त दरात दर्जेदार आंबा थेट घरी उपलब्ध व्हावा, यासाठी राज्य कृषी पणन मंडळाने ऑनालाइन आंबा महोत्सव सुरू केला आहे. याकरिता पणन मंडळाचे https://bs.msamb.com हे खरेदी-विक्रीकरिता ऑनलाइन पोर्टल कार्यरत करण्यात आलेले असून यावर आंबा उत्पादक तसेच ग्राहक नोंदणी करू शकतात. या पोर्टलद्वारे गृहनिर्माण संस्थेमधील जास्तीत जास्त सभासदांनी एकत्रित नोंदणी केल्यास कोकणातील आंबा उत्पादकांना थेट सोसायटीमध्ये आंबा पुरविण्यात येणार आहे.



याबाबत पणन मंडळाचे सरव्यवस्थापक दिपक शिंदे यांनी माहिती दिली. शिंदे म्हणाले, "पणन मंडळाच्या वतीने दरवर्षी 'उत्पादक ते ग्राहक थेट विक्री' योजने अंतर्गत आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. विक्री व्यवस्थेमधील मध्यस्थांची संख्या कमी करून शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव व ग्राहकांना रास्त दरात चांगल्या गुणवत्तेचा माल मिळावा हा उद्देश महोत्सवाचा असतो. मात्र, गेल्या दोन वर्षांचा कोरोना प्रादर्भावाच्या पार्श्वभूमीवर थेट आंबा उत्पादक व ग्राहकांची भेट घडवून आणण्यासाठी महाराष्ट्र राज्य कृषी मंडळामार्फत ऑनलाइन सुविधा देण्यात आली आहे.

यावर्षी रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड या जिल्ह्यातील हापूस आंबा उत्पादकांबरोबरच मराठवाड्यातील केशर आंबा उत्पादकही सहभागी होणार आहेत. पणन मंडळाकडे कोकणातील बहुतांश आंबा उत्पादकांची नोंदणी प्रक्रिया पूर्ण झालेली असून आंबा विक्री सुरू झालेली आहे. यावर्षी मराठवाड्यातील महाकेशर संघाद्वारे मोठ्या प्रमाणावर राज्यातील केशर आंबा उत्पादकांना एकत्र आणले असून त्यांनीही पोर्टलवर नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## गेल्यावर्षी ६५ हजार डझनची ऑनलाइन विक्री

गेल्यावर्षी सुमारे ६५ हजार डझन आंबा पोर्टलद्वारे विक्री करण्यात आलेला होता. तरी यावर्षीही ग्राहकांनी जास्तीत जास्त नोंदणी करून, दर्जेदार आंब्याची चव घ्यावी, असे आवाहन दीपक शिंदे यांनी केले आहे. तर अधिक माहितीसाठी सहायक सरव्यवस्थापक मंगेश कदम ( मोबाईल - ७५८८०२२२०१) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

दै. "ॲग्रोवन" दि. २६/४/२०२१.

# रत्नागिरीत ३७ टन काजू बी तारण

## बाजार समितीकडून प्रति किलोला ८५ रुपये दर

**ॲग्रोवन वृत्तसेवा**

रत्नागिरी : काजूचे बाजारातील दर घसरल्यानंतर उत्पादक शेतकऱ्यांकडील काजूसाठी शेतीमाल तारण कर्ज योजना जिल्हा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून राबविण्यात येत आहे. यंदा बाजार समितीकडे ३७ टन काजू बी तारण ठेवण्यात आली. बाजारातील दराच्या ७५ टक्क्यांप्रमाणे काजू बीसाठी किलोला ८५ रुपये दर मिळाला आहे.



कृषी पणन मंडळाच्या शेतीमाल तारण कर्ज योजनेमुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या शेतीमालाच्या काढणी हंगामात कमी भावाने विक्री न करता तो शेतीमाल बाजार समितीच्या गोदामामध्ये तारणात ठेवून शेतकऱ्यांना तारण कर्जाच्या स्वरूपात सुलभ आणि त्वरित कर्ज उपलब्ध करून देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांनी उत्पादित केलेला शेतीमाल बाजार समितीच्या गोदामात तारण योजनेअंतर्गत ठेवण्यात येतो.

हंगामाच्या कालावधीत शेतीमाल एकाच वेळी मोठ्या प्रमाणात विक्रीसाठी आणला जातो. त्यामुळे शेतीमालाचे बाजारभाव कमी होतात. शेतीमालास योग्य बाजारभाव न मिळाल्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होते. मात्र काढणी हंगामात शेतीमालाची साठवणूक करून तो काही कालावधीनंतर बाजारपेठेत विक्रीस आणल्यास त्या शेतीमालास जादा बाजारभाव मिळू शकतो. तसेच शेतकऱ्यास हंगामाच्या वेळी असणारी आर्थिक निकड विचारात घेऊन त्यांना या गरजेच्यावेळी आर्थिक साह्य उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ शेतीमाल तारण कर्ज योजना राबवीत आहे.

### गतवर्षी मिळाला अडीचपट दर

गतवर्षी लॉकडाउन काळात काजू बीचे दर घसरले होते. बाजार समितीने ५६ रुपये किलोने तारण ठेवून शेतकऱ्यांना कर्ज दिले होते. ९३ टन काजू बी तारण ठेवण्यात येऊन ५३ लाख रुपये कर्जाचे वाटप करण्यात आले होते. सप्टेंबर महिन्यात शेतकऱ्यांनी काजू बीची विक्री केली असता किलोला १२० ते १३० रुपये किलो इतका अडीचपट दर प्राप्त झाला होता.

दै. "ॲग्रोवन" दि. १/५/२०२१.

# कोविड रुग्णालये उभारण्यास बाजार समित्यांना मान्यता

## पणन मंत्री बाळासाहेब पाटील यांची माहिती : १० लाखांपर्यंतच्या भांडवली खर्चास मंजुरी

**ॲग्रोवन वृत्तसेवा**

पुणे : राज्यात कोरोना रुग्णसंख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. रुग्णांना रूग्णालयात, कोविड सेंटरमध्ये बेड, ऑक्सिजन बेड मिळणे कठीण होत आहे. या पार्श्वभूमीवर कोविड उपचाराशी निगडित विलगीकरण कक्ष, ऑक्सिजन सेंटर, ऑक्सिजन सिलिंडर, ऑक्सिजन बेड, सॅच्युरेटेड, ऑक्सिजन मशिनचा पुरवठा अशा कोविड उपचाराशी निगडित सुविधा उपलब्ध होण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समित्यांना कोविड केअर सेंटर सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे, अशी माहिती सहकार व पणन मंत्री बाळासाहेब पाटील यांनी दिली.

मंत्री श्री. पाटील म्हणाले, "बाजार समित्यांना मागील वर्षाच्या वाढाव्याच्या २५ टक्के रकमेच्या मर्यादित कोविड केअर सेंटर सुरू करण्यासाठी मान्यता देण्यात आली आहे. यासाठी रुपये १० लाखांपर्यंतच्या भांडवली खर्चास मंजुरी देण्याचे अधिकार जिल्हा उपनिबंधक यांना देण्यात आले असून रुपये १० लाखांच्या वरील प्रस्ताव प्राप्त झाल्यास अशा प्रस्तावाच्या भांडवली खर्चास मान्यता देण्याचे अधिकार पणन संचालक यांना देण्यात आले आहेत. बाजार समितीच्या मुख्य आवारात सेंटर सुरू करण्यात यावे. सेंटरवरील विलगीकरण कक्षात बाजार समितीकडून ऑक्सिजन, बेड सुविधा उपलब्ध करून देणे व सॅच्युरेटेड ऑक्सिजन पुरवठा करावयाच्या मशिनचा पुरवठा करावा. तसेच रुग्णांना जेवण, नाश्ता, चहाची व्यवस्था करण्यात यावी.

**"कोरोनाच्या संकटात बाजार समित्यांनी सामाजिक बांधिलकीतून त्यांच्याकडील निधीचा वापर लोकहितासाठी करणे आवश्यक आहे. अशा सूचना पणन मंत्री बाळासाहेब पाटील यांनी केल्या होत्या. तसेच बाजार घटकांसाठी लसीकरण केंद्रे सुरू करण्याच्याही सूचना दिल्या आहेत. आता त्याही पुढे जात कोविड सेंटरबाबतच्या सूचना मंत्री पाटील यांनी केल्या. त्यानुसार प्रस्ताव राज्य सरकारला सादर केला होता. त्याला सरकारने मंजुरी दिली आहे. त्याची अंमलबजावणी तत्काळ करण्यात येणार आहे.**

– **सतीश सोनी**, पणन संचालक, महाराष्ट्र राज्य

**सद्यःस्थितीत बाजार समिती टोमॅटो, कांदा, भाजीपाला विभाग पूर्ण क्षमतेने सुरू असल्याने कोविड सेंटर उभारू शकत नाही. मात्र तालुक्यातील कोविड सेंटर लागणारी अन्नधान्य भाजीपाल्याचा पुरवठा करण्याचे काम स्थानिक प्रशासनासोबत समन्वय साधत करण्याचे प्रयत्न आहेत.**

– **संजय काळे**, सभापती जुन्नर बाजार समिती, जि. पुणे

दै. 'अॅग्रोवन' दि. 3/5/2021

# वसमत बाजार समितीत आजपासून हळदीचे ई-लिलाव

## अडत्याच्या क्रमांकानुसार पाच दिवसांचे लिलाव नियोजन

**अॅग्रोवन वृत्तसेवा**

हिंगोली : जिल्ह्यातील वसमत कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये ई-नाम अंतर्गत सोमवार (ता. ३) पासून ई-लिलावाद्वारे हळद खरेदी केली जाणार आहे. अडत्यांच्या अनुक्रमांकानुसार आठवड्यातील पाच दिवसांचे हळद खरेदीचे नियोजन करण्यात आले आहे. लिलावात सहभागी न होता परस्पर सौदे करून खरेदी- विक्रीचे व्यवहार केल्यास कारवाई केली जाणार आहे, अशी माहिती बाजार समितीचे सचिव एस. एन. शिंदे यांनी दिली.

शिंदे म्हणाले, की जिल्हाधिकारी रुचेश जयवंशी यांनी कोरोनाचा संसर्ग रोखण्यासाठी दिलेल्या आदेशानुसार बाजार समितीचे कामकाज सकाळी नऊ ते सायंकाळी सहा या वेळेत केले जाईल. हळद खरेदी हंगाम सुरू झाल्यामुळे लिलाव कक्षात मध्ये ई-लिलावाद्वारे हळद खरेदी केली जाणार आहे. दररोज सकाळी साडेआठ ते नऊ वाजेपर्यंत आवक नोंद करण्यात येईल. बीट असलेल्या अडतीमध्ये केवळ पंधरा लॉट ई-नाम टेंडरसाठी काढण्यात यावे. लिलाव कक्षात सकाळी नऊ ते साडेदहा या वेळेत बिटाचे कट्टे (पोते) स्वीकारण्यात येतील. सकाळी साडेदहा ते अकरा या वेळेत कट्टे फोडून लॉग टॅगिग करण्यात येईल. खरेदीदारांना सकाळी अकरा ते दुपारी अडीच या वेळेत टेंडर भरता येईल. अडतीदारांना दुपारी अडीच ते तीन या वेळेत लॉट रद्द करता येतील. तसेच शेतकऱ्यांची सहमती दिलेल्या नमुन्यात घेता येईल. खरेदीदारांनी भरलेल्या भावाबाबत वाद निर्माण झाल्यास अंतिम निर्णय बाजार समितीचा राहील.



### परस्पर सौदे केल्यास कारवाई...

बाजार समितीमध्ये जवळपास १८० परवानाधारक खरेदीदार आहेत. परंतु त्यातील मोजकेच खरेदीदार लिलावामध्ये भाग घेत आहेत. लिलाव कक्षामध्ये कोरोनाची खबरदारी घेण्यात येत आहे. त्यामुळे खरेदीदारांनी लिलावामध्ये भाग घ्यावा. अन्यथा, संबंधितावर कारवाई करण्यात येईल. लिलावात भाग न घेता परस्पर सौदे खरेदी-विक्रीचे व्यवहार केल्याचे निदर्शनास आल्यावर अडते, खरेदीदारांविरुद्ध तत्काळ कार्यवाही करण्यात येईल, याची गांभीयनि नोंद घ्यावी, असे शिंदे यांनी सांगितले.

### ई-लिलावाचे नियोजन

सोमवार (ता. ३) अडतदार क्रमांक १२१ ते १५०, मंगळवार (ता. ४) अडतदार क्रमांक १ ते ३०, बुधवार (ता. ५) अडतदार क्रमांक ३१ ते ६०, गुरुवार (ता. ६) अडतदार क्रमांक ६१ ते ९०, शुक्रवार (ता. ७) अडतदार क्रमांक ९० ते १२०.

दै. "पुढारी" दि. 3/5/2021

# ४९५ मे. टन आंब्याची निर्यात

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्य कृषी पणन मंडळाच्या विविध निर्यात सुविधा केंद्राच्या वापरातून राज्यातून २९ एप्रिलअखेर हापूस व केशर आंब्याची मिळून सुमारे ४९५.८३ मे. टन निर्यात झाली आहे. एकूण २० निर्यातदारांमार्फत राज्यातील १८० ते २०० शेतकऱ्यांचा आंबा निर्यात करण्यात आल्याची माहिती मंडळाचे सरव्यवस्थापक दीपक शिंदे यांनी दिली.

राज्यात चालू वर्षी आंब्याचे उत्पादन कमी आहे. मात्र, कोरोना साथ कायम असूनही पणन मंडळाच्या सुविधांच्या वापरातून आंबा निर्यात सुरळीत सुरू आहे. मंडळाच्या मुंबईतील वाशी येथील केंद्रातून दरवर्षीच निर्यात होत असते. व्हीपीएफ सुविधा केंद्राचा वापर करून इंग्लंड येथे सर्वाधिक २७५.४९ मे. टन आंबा निर्यात झाला. तसेच ५३.७२ मे. टन आंब्यांची निर्यात ही प्रामुख्याने जर्मनी, स्वित्झर्लंड, आयर्लंड, बेल्जियम, फ्रान्स, स्वीडन, इटली, नेदरलॅण्ड आदी देशांना झालेली आहे.



व्हीएचटी सुविधा केंद्राच्या वापरातून जपानला ७.१७ मे. टन, युरोपियन देशात १.८९ मे. टन तसेच कॅनडा, सिंगापूर, युएईमध्ये २७.१४ मे. टन आंबा निर्यात झाली आहे. तसेच बारामती येथील निर्यात सुविधा केंद्रातून युरोपात १२५ मे. टन आंबा निर्यात झाली. तसेच रत्नागिरी येथील आंबा निर्यात सुविधा केंद्रातून ५.४२ मे. टन आंब्याची युरोपसह कॅनडा, कतार देशात निर्यात झाली. अद्याप अमेरिकेला निर्यात सुरू झालेली नाही. त्यामुळे चालूवर्षी आणखी एक हजार मे. टन आंब्याची निर्यात होण्याची अपेक्षा असल्याचे ते म्हणाले.

दै. "ॲग्रोवन" दि. २०।५।२०२१.

# हापूसच्या ४० हजार पेट्या थेट ग्राहकांच्या दारात

## 'पणन'च्या ऑनलाइन पोर्टलचा लाभ; मोठ्या शहरात झाली विक्री

**ॲग्रोवन वृत्तसेवा**

रत्नागिरी : उत्पादक शेतकरी ते थेट ग्राहक ही साखळी तयार करण्यासाठी पणन महामंडळाच्या ऑनलाइन नोंदणीच्या प्रयोगाला सलग दुसऱ्या वर्षीही चांगला प्रतिसाद मिळाला. ऑनलाइन पोर्टलच्या माध्यमातून हापूसचे ४० हजार पेट्या थेट ग्राहकांच्या दारात पोहोचल्या. कोरोनामुळे निर्माण झालेली ही विक्री साखळी भविष्यात बागायतदारांना उपयुक्त ठरणार आहे.



उत्पादक, शेतकरी हे ग्राहकाला थेट शेतीमाल विक्री करू शकतील अशी यंत्रणा गतवर्षी 'पणन'ने सुरू केली होती. त्यासाठी bs.msamb.com या वेबसाइटवर बागायतदार आणि खरेदीदार यांनी आपली नोंदणी करावयाची आहे. यामध्ये मागणी किमान शंभर बॉक्सची ठेवण्यात आली होती. या पोर्टलवर रत्नागिरी जिल्ह्यातील ३५० बागायतदारांनी थेट विक्रीसाठी नावे नोंदवली होती. यामधून दोन डझनाच्या २५ बॉक्सपासून ते हजार बॉक्सपर्यंतची मागणी खरेदीदारांनी केली होती. त्यानुसार बागायतदारांनी वाहतुकीच्या माध्यमातून तर काहींनी थेट स्वतःच्या गाडीने ग्राहकांपर्यंत हापूसचे बॉक्स पोहोचवले. यामध्ये मुंबई, पुणे, सोलापूर, बारामती, अकोल्यापर्यंत हापूस पोहोचला आहे. पान ४ वर »

> **'पणन'च्या वेबसाइटवर ग्राहक किंवा शेतकऱ्यांनी नोंदणी करणे आवश्यक आहे. या माध्यमातून खरेदी-विक्रीचा प्रयोग केला जात आहे. यामध्ये आंब्याचा दर किती याची माहिती ग्राहकाला मिळते. या सुविधेचा लाभ कसा घ्यावा.**
>
> **- भास्कर पाटील**, सरव्यवस्थापक, पणन

## हापूसच्या ४० हजार पेट्या थेट ग्राहकांच्या दारात

» पान १ वरून

कोरोनामुळे गतवर्षी वाहतुकीत अडचणी निर्माण झाल्या होत्या. अशावेळी कृषी आणि पणन विभागाकडून बागायतदारांना हा दिलासादायक मार्ग दाखवला होता. थेट विक्रीमुळे दर्जेदार हापूसला चांगला दर मिळत असून काही मिनिटांत पैसे बँक खात्यात जमा होतात. मागणी नोंदवली की लगेचच पैसेही जमा होत असल्यामुळे थकीत राहण्याचा प्रश्नच उरत नाही. या पद्धतीने गतवर्षी ८० हजार बॉक्सची विक्री झालेली होती.

यंदा उत्पादन कमी असले तरीही वाशी फळबाजारात हापूसचे दर कमी झाल्यामुळे थेट विक्रीचा टक्का वाढण्याची शक्यता आहे.

दै. "सामना" दि. १०/५/२०२१.

# बाजार समित्यांनाही उभारता येणार कोविड सेंटर

## दहा लाखांपर्यंत खर्चाची परवानगी

पुणे, दि. ९ (प्रतिनिधी)– वाढत्या कोरोना प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील बाजार समित्यांना आता कोविड केअर सेंटर उभे करता येणार आहे. समित्यांना मागील वर्षाच्या वाढाव्याच्या २५ टक्के रकमेच्या मर्यादेत कोविड केअर सेंटर सुरू करण्यासाठी सहकार, पणन विभागाने नुकतीच परवानगी दिली आहे. कोविड केअर सेंटर तातडीची आणि अत्यावश्यक असल्याने समित्यांना सुरुवातीला दहा लाख व मान्यता घेऊन त्यापेक्षा अधिक खर्च करता येणार आहे.

राज्यातील ज्या बाजार समित्यांना कोविड सेंटर उभे करायचे आहे, त्या समित्यांना सहकारी संस्था, जिल्हा उपनिबंधक यांची परवानगी घ्यावी लागणार आहे. तसेच दहा लाखांपेक्षा जास्त खर्च येत असणाऱ्या समित्यांना पणन संचालकांची परवानगी घ्यावी लागणार आहे. तसेच या खर्चास मान्यता देण्याचे सर्व अधिकार त्यांच्याकडे असणार आहेत. यासाठी या विभागाने काही नियमही घालून दिले आहेत. राज्यातील कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे पणन संचालक सतीश सोनी यांनी समित्यांना कोविड केअर सेंटर सुरू करता यावे, यासाठी राज्य शासनाला प्रस्ताव सादर केला होता.

यामध्ये कोविड केअर सेंटर हे प्रामुख्याने कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मुख्य आवारात सुरू करण्यात यावे. सेंटरवरील विलगीकरण कक्षात बाजार समितीकडून ऑक्सिजन केंद्र किंवा ऑक्सिजन सिलिंडर बेड सुविधा उपलब्ध करून देणे व सॅच्युरेटेड ऑक्सिजन पुरवठा करावयाच्या मशिनचा पुरवठा करण्यात यावा. या सेंटरमध्ये विलगीकरण कक्षात येणाऱ्या रुग्णांना बाजार समितीने दोन वेळेस जेवण, नाष्टा आणि चहाची व्यवस्था करायची आहे.

समित्यांनी व्यापारी संघटनांना आवाहन करून प्रायोजकत्व मिळविण्यासाठी प्रयत्न करावेत. कोविड केअर सेंटरचा कालावधी लॉकडाऊन आणि त्यानंतर ३० दिवसांचा असेल. कालावधी वाढविण्याची आवश्यकता असल्यास जिल्हा आपत्ती व्यवस्थापनकडे प्रस्ताव सादर करावेत, असे आदेशात नमूद केले आहे.

### शासनाकडून अनुदान नाही

कोविड केअर सेंटर सुरू झाल्यानंतर राज्य शासनाने कोविड्संदर्भात निर्गमित केलेल्या आदेशाचे पालन करणे बंधनकारक असणार आहे. कोविड केअर सेंटरवर झालेल्या खर्चाची नोंद स्वतंत्ररीत्या विशेष नोंदवहीत नमूद करून याबाबतचा अहवाल शासनास सादर करावयाचा आहे. तसेच कोविड केअर सेंटरसाठी शासनाकडून कोणतेही अनुदान देण्यात येणार नसल्याचे आदेशात म्हटले आहे.

दै. "लोकमत" दि. १२।५।२०२१

# हापूस उत्पादकांनी शोधले विक्रीचे पर्याय

ऑन द ग्राउंड
कोकण

## थेट संपर्कातून केली विक्री; परदेशातील खवय्यांकडून यंदाही मोठी मागणी




कोकणातील आंबा उत्पादक मुंबई, पुण्यासह मागणीनुसार आंब्यांच्या पेट्या तयार करून त्याचे वितरण करत आहेत.

**मनोज मुळ्ये/महेश सरनाईक**
लोकमत न्यूज नेटवर्क

**रत्नागिरी :** लाखो लोकांच्या जिभेवर राज्य करणाऱ्या कोकणाच्या राजाला, 'हापूस'ला गतवर्षापासून कोरोनाचे ग्रहण लागले आहे. कोरोनामुळे सुरू झालेल्या लॉकडाऊनचा खूप मोठा फटका हमखास विक्री असलेल्या या फळाला आणि कोकणातील बागायतदारांना बसला आहे; पण कोकणी माणूस कधी हरत नाही. निसर्गाचे आव्हान पेलून बाजारपेठा बंद होत असताना कोकणी बागायतदारांनी आंबा विक्रीचे नवे पर्याय शोधले. बाजारपेठ नाही म्हणून आंबा फुकट गेला, असा प्रकार कोठेही घडला नाही.

लॉकडाऊन सुरू होण्याआधी आंबा परदेशात रवाना झाला. आंब्याची मुख्य बाजारपेठ असलेल्या वाशी कृषी उत्पन्न समितीच्या बाजारपेठेत आंब्याची विक्री चांगली झाली. बागायतदारांनी थेट ग्राहकांशी संपर्क साधण्यावरच भर दिला आणि बहुतांश आंब्याची विक्री थेट संपर्कातूनच झाली.




## सोशल मीडियाचा आधार

- बाजारपेठा बंद असल्याने शेतकऱ्यांनी थेट ग्राहकांशी संपर्क साधण्यावर अधिक भर दिला. त्यात सोशल मीडियाचा आधार खूप मोठा होता. व्हॉट्सॲप, फेसबुकद्वारे जाहिरात करून शेतकरी ग्राहकांपर्यंत पोहोचले.
- बाजार बंद असल्याने ग्राहकांनाही या माध्यमातून शेतकऱ्यांपर्यंत पोहोचता आले. गतवर्षी या पद्धतीचा प्रथमच मोठ्या प्रमाणात वापर झाला. त्यामुळे अनेक बागायतदारांकडे ग्राहकांची यादीच तयार होती.
- त्यामुळे त्याचे मार्केटिंगही सोपे झाले. काही ठिकाणी संपूर्ण सोसायट्यांमध्ये मार्केटिंग करुन गाडी भरुन पाठविण्याचा पर्यायही वापरला गेला.

## पणन मंडळाचा हातभार

शेतकऱ्यांचा आंबा थेट ग्राहकापर्यंत जावा, तो परदेशीही थेट जावा, यासाठी पणन मंडळाने मोलाची भूमिका बजावली. पणन मंडळाने नियुक्त केलेल्या सद्गुरू एंटरप्रायझेसच्या माध्यमातून ही थेट विक्री झाली. परदेशी गेलेला आंबा सद्गुरू एंटरप्रायझेसच्या माध्यमातूनच पाठवला गेला होता. त्याखेरीज दिल्लीमध्ये ७,२०० बॉक्स आणि थेट ग्राहकांपर्यंत ४० हजार बॉक्स आंबा पाठवण्यात आला.

## शेतकरी स्वयंपूर्ण झाले

आतापर्यंत दलालावर अवलंबून असलेले शेतकरी कोरोनामुळे स्वावलंबी झाले आहेत. आतापर्यंत दलालाच्या हातात माल देऊन निवांत 'पट्टी'ची (आंब्याची दलालाकडून ठरवली जाणारी रक्कम) वाट पाहणारे शेतकरी माल संपण्यासाठी स्वत: धडपडून उठले. त्यामुळे दलालांच्या खिशात जाणारी रक्कमही थेट शेतकऱ्यांनाच मिळाली. स्वयंपूर्णतेमुळे शेतकऱ्यांना आर्थिक लाभही मोठा झाला.

**कमी उत्पादनाचा फटका** दरवर्षी मार्चमध्ये २५ हजार ते ३० हजार पेट्या बाजारात जातात. यावर्षी हे प्रमाण १० ते १२ हजार पेटी असे मर्यादित आहे. १० ते १५ एप्रिलदरम्यान गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर एक लाख हापूसच्या पेट्या बाजारात जातात.

**३५** हजार पेट्याच बाजारात गेल्या आहेत. हापूसचे उत्पादन कमी म्हणजे बाजारातील आवकही कमी. मागणी जास्त त्यामुळे दरही वधारून आहेत.

## थेट ग्राहकापर्यंत पोहोचविण्याचा मार्ग

- एप्रिलमध्ये हापूस आंब्याला १,५०० ते ३,५०० रुपये पेटी (एक पेटी म्हणजे ५ ते ६ डझन आंबे) असा दर असतो.
- यावर्षी २,००० ते ५,००० रुपये प्रतिपेटी दर मिळतोय. हापूसला अधिक दर मिळण्याचे अजून एक कारण म्हणजे काही आंबा बागायतदारांनी मुंबई, पुणे येथील ग्राहकांना थेट आंबा विक्री सुरु केली आहे.

दै."ॲग्रोवन" दि. 19/5/2021.

# राज्यभरात १४ बाजार समित्यांनी उभारली कोरोना उपचार केंद्रे

## सतीश सोनी : रुग्णशय्येची संख्या बारा हजारांपर्यंत वाढवणार

**ॲग्रोवन वृत्तसेवा**

पुणे : राज्यात कोरोनाचा वाढता फैलाव आणि येणाऱ्या लाटेच्या पार्श्वभूमीवर पणन मंत्री बाळासाहेब पाटील यांच्या आवाहनाला साद देत १४ बाजार समित्यांनी सुमारे बाराशे रुग्णशय्येची कोरोना उपचार रुग्णालये उभारली आहेत. तर २२ बाजार समित्यांचे प्रस्ताव दाखल झाले असल्याची माहिती पणन संचालक सतीश सोनी यांनी दिली.

याबाबत सोनी म्हणाले, "कोरोनाच्या वाढत्या फैलावामुळे ग्रामीण भागातच उपचार मिळण्यासाठी बाजार समित्यांनी कोरोना उपचार केंद्रे सुरू करावीत, असा प्रस्ताव राज्य शासनाला सादर केला होता. या प्रस्तावाला राज्य शासनाने मंजुरी दिली. त्यानुसार २२ बाजार समित्यांनी प्रस्ताव पाठविले होते. त्यापैकी १४ बाजार समित्यांच्या प्रस्तावाला मान्यता देत उपचार केंद्रे सुरू झाली आहेत. ज्या बाजार समित्यांच्या परिसरात उपचार केंद्रे आहेत, त्यांनी स्थानिक प्रशासनासोबत समन्वय साधत विविध साधनसामग्री खरेदी करून द्यावीत, असे देखील सूचित करण्यात आले होते. खामगाव आणि भिवंडी या दोन बाजार समित्यांनी वैद्यकीय साहित्यासाठी प्रत्येकी २५ लाखांचा निधी दिला आहे.

### या बाजार समित्यांमध्ये उपचार केंद्रे सुरू

पारोळा, नगर, शेवगाव, बार्शी, मानवत, जिंतूर, सेलू, परभणी.

### येथे होणार लवकरच सुरुवात

संगमनेर, परळी, श्रीरामपूर.

" राज्यातील ३०६ बाजार समित्या असून, त्यापैकी नफ्यातील बाजार समित्यांची संख्या १३७ आहे. ज्या बाजार समित्यांचा नफा चांगला आहे, अशा बाजार समित्यांनी कोरोना उपचार केंद्रे सुरू करण्याबाबत पणन संचालनालयाकडून प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्याला राज्यशासनाने मंजुरी दिली आहे. १३७ बाजार समित्यांनी कोरोना उपचार केंद्रे सुरू करणे अपेक्षित आहे. तसे झाल्यास ग्रामीण भागात १ हजार २०० रुग्णशय्या उपलब्ध होणार आहे.

– **सतीश सोनी**, पणन संचालक